cmyk

## संपादकीय

### पवारांच्या बोलण्याचा अर्थ अन्वयार्थ...

लोकसभा निवडणुकीनंतर अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील असे वक्तव्य ज्येष्ठ नेते, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) अध्यक्ष शरद पवार यांनी राजकीय क्षेत्रात खळबळ उडवून दिली. शरद पवारांच्या वक्तव्यावरून अनेक राजकीय तर्क लावले जात आहेत. काँग्रेसने या वक्तव्याचे स्वागत व समर्थन केले आहे, तर भाजप नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वक्तव्याची खिल्ली उडवली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर सर्वच प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील. प्रादेशिक पक्षांना त्यांचा पराभव लक्षात आला आहे. त्यांचे अस्तित्व टिकवायचे असेल तर त्यांना काँग्रेसमध्ये जावेच लागेल.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-३१ | रविवार दि.१२ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये


### छत्तीसगडमध्ये १२ नक्षल्यांचा खात्मा

गडचिरोली : प्रतिनिधी

छत्तीसगढमधील बिजापूर जिल्ह्यातील गंगालूर पोलिस स्टेशनच्या हद्दीतील पीडिया जंगल परिसरात नक्षलवाद्यांशी चकमक झाली. त्यामध्ये १२ नक्षलवाद्यांचा खात्मा केल्याची माहिती समोर आली आहे. सुरक्षा रक्षकांनी नक्षलवाद्यांच्या टॉप कमांडर लिंगा आणि पापारावला या जंगलात घेरले आणि चकमक झाली. बिजापूर जिल्ह्यातील गंगालूर पोलिस स्टेशन हद्दीतील पीडिया जंगल परिसरात सुरक्षा दल आणि माओवाद्यांमध्ये मोठी चकमक झाली. गुरुवारी रात्री उशिरा जवानांच्या संयुक्त पथकाला नक्षल विरोधी अभियानासाठी या परिसरात रवाना करण्यात आले होते.

# यंदा भरपूर पाऊस पडणार !

## ३५० वर्ष जुन्या भेंडवळच्या घटमांडणीची भविष्यवाणी, शेतकऱ्यांना दिलासा

बुलढाणा । प्रतिनिधी

राज्यात सध्या सर्वच शेतकऱ्यांना मान्सूनच्या पावसाचे वेध लागले आहेत. परिणामी, राज्यात सर्वदूर सध्या शेतीची मशागतीची कामे उरकताना दिसून येत आहेत. अशातच आता यंदाच्या मान्सूनच्या पावसाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. विदर्भातील जवळपास ३५० वर्षांपासूनची जुनी परंपरा म्हणजे बुलढाणा जिल्ह्यातील भेंडवळची घटमांडणी होय. भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या (आयएमडी) यंदाच्या वर्षीच्या चांगल्या पावसाच्या



अंदाजानंतर आता भेंडवळची घटमांडणीमध्ये देखील यंदाच्या वर्षी चांगला पाऊस पडणार असल्याचे भाकीत करण्यात आले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील भेंडवळ येथे अंबाडी हे कुलदैवत असून, त्यावर लोकांची श्रद्धा आहे.

◀◀ पान २ वर

### असे असेल यंदा पीकपाणी

यंदाच्या वर्षी कपाशी पीक हे सर्वसाधारण राहणार असल्याचे भाकितही भेंडवळची घटमांडणी दरम्यान करण्यात आले आहे. ज्वारी सर्वसाधारण राहणार असल्याचे भाकित सांगण्यात आले आहे. तूर पीक सर्वसाधारण मात्र अनिश्चित उत्पादन असल्याचे सांगण्यात आले आहे. मूग आणि उडीद पीक देखील सर्वसाधारण असणार आहे. यंदा तीळ पिकाचे चांगले उत्पादन मिळणार आहे. बाजरी पीक सर्वसाधारण असेल तर साळीचे पीक चांगले येईल. जवस सर्वसाधारण पीक येईल तर वाटाणा पीक देखील सर्वसाधारण असणार आहे. याउलट गहू पीक यंदा भरपूर प्रमाणात मिळणार आहे. हरभरा पीक देखील यंदा चांगले येणार आहे. मात्र त्यास भावाबाबत अनिश्चितता असणार आहे. असे भाकीतही पीक पाण्याबाबत करण्यात आले आहे.

## चौथ्या टप्प्याचा प्रचार थंडावला, उद्या मतदान

### देशातील १० राज्यांतील ९६ ठिकाणी तर महाराष्ट्रात ११ मतदारसंघांत मतदान

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या राज्यातील चौथ्या टप्प्यात ११ लोकसभा मतदारसंघांत १३ मे रोजी मतदान होणार असल्याने या मतदारसंघांतील प्रचार तोफा शनिवारी संध्याकाळी थंडावल्या. आता राहिलेल्या एक दिवसात भेटीगाठीवर भर दिला जाणार आहे. महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा व कोकणातील काही मतदारसंघांचा या टप्प्यात समावेश आहे. दरम्यान, या चौथ्या टप्प्यात



देशात १० राज्यातील ८६ मतदारसंघात १३ मे रोजी मतदान पार पडत आहे.

या चौथ्या टप्प्यात राज्यातील नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर,

◀◀ पान २ वर

### मोदींनी धाडस काय असते ते गांधींकडून शिकावे



नवी दिल्ली । वृत्तसेवा

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे एका विशिष्ट समुदायाचा उल्लेख करून त्यांना सातत्याने धमकी देण्याचा प्रयत्न करतात. ज्या पंतप्रधान पदावर आज ते विराजमान आहेत त्या पदाची शान यापूर्वीच्या अनेक पंतप्रधानांनी राखली आहे. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पंतप्रधान पदाच्या सर्वोच्च स्थानी विराजमान असतानाही महिलांचा सन्मान राखण्यात अपयशी ठरले. पंतप्रधान मोदींनी धाडस काय असते ते इंदिरा गांधी यांच्याकडून शिकावे, अशा शब्दांत काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. पुढे बोलताना प्रियांका गांधी म्हणाल्या की, पंतप्रधान पदाच्या खुर्चीवर यापूर्वी पंडित जवाहरलाल नेहरू, अटलबिहारी वाजपेयी, मनमोहन सिंग, इंदिरा गांधी, पंतप्रधान राजीव गांधी यांच्यासारख्या अनेक चांगल्या व्यक्ती या पदावर विराजमान झाल्या.

## प्रचाराच्या तोफा थंडावल्या! अजितदादांनी वातावरण फिरवले; सोनवणेंसाठी साहेबांनी बळ लावले!

# उदयनराजेंच्या रुपाने छत्रपतींचे पंकजाताईला मिळाले आशिर्वाद

आष्टी/कडा/परळी । प्रतिनिधी

लोकसभेच्या चौथ्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा शनिवारी सायंकाळी ६ वा. थंडावल्या. भाजपच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्यासाठी छत्रपती उदयनराजे भोसले यांनी तीन ठिकाणी सभा घेतल्या. त्यामुळे बीड जिल्ह्यातील राजकीय वातावरण फिरले असून उदयनराजेंच्या रुपाने छत्रपतींचा आशिर्वाद पंकजाताईला मिळाला असल्याचे म्हटले जात आहे. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कडा येथे सभेला उपस्थित राहून बजरंग सोनवणेंवर हल्लाबोल करीत वातावरण फिरवले. दुसरीकडे शरद पवार यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्यासाठी बीड जिल्ह्यात तीन मुक्काम केले. त्यामुळे सोनवणेंसाठी पवारांनी बळ लावल्याचे दिसते.



### तुम्हाला माझी अन् छत्रपती शिवरायांची शपथ-उदयनराजे

कडा -छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज छत्रपती उदयनराजे भोसले खास साताऱ्याहून बहिणीच्या म्हणजेच पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी आज जिल्हयात आले होते. पंकजाताई तुमची मुलगी, बहीण, आहे. तिला मतदान करायचे नाही तर कोणाला करायचे? माझी भगिनी पंकजाताई मुंडेला आता संधी मिळाली आहे, (पान २ वर)

### मराठवाड्याच्या विकासासाठी पंकजाताई आवश्यक- उपमुख्यमंत्री अजित पवार

मराठवाड्याच्या मागासलेपणाचा शिक्का पुसून विकासाच्या प्रवाहात मराठवाडा यावा यासाठी गोपीनाथ मुंडे साहेबांनी आजन्म संघर्ष केला. तोच विचार घेऊन आम्ही पुढे जात आहोत. सर्व जाती, धर्मांचा बंधुभाव टिकून राहावा यासाठी आम्ही महायुती सरकारच्या माध्यमातून काम करत आहोत. ही लोकसभा निवडणूक देशाची आणि आपल्या भागाच्या विकासाची आहे, त्यामुळे आपण भावनिक होऊन मतदान करू नका. विकासाच्या माध्यमातूनच आपल्याला बीडच्या मागासलेपणाचा शिक्का मिटवून टाकण्यासाठी पंकजाताईला निवडूण देण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

### ज्यादिवशी साहेबांवर अंत्यसंस्कार केले त्याच दिवशी निकाल; पंकजांची भावनिक साद

४ जूनला याच दिवशी मुंडे साहेबांवर याच हाताने अंत्यसंस्कार केले. त्याच दिवशी म्हणजे ४ जूनला निकाल येणार असल्याचे सांगून पंकजाताई मुंडे यांनी मतदारांना भावनिक साद घातली आहे. परळी येथील प्रचाराच्या सांगता सभेत त्या बोलत होत्या. मराठवाड्यातील हाय व्होल्टेज लढत असलेल्या बीड लोकसभा मतदारसंघात पंकजा मुंडेंसाठी शनिवारी उदयनराजे भोसले व अजित पवारांनी सांगता सभा घेतली. यावेळी, भाऊ धनंजय मुंडे हेही व्यासपीठावर होते. बीडमधील भाषणात पंकजा मुंडेंनी त्यांचे दिवंगत वडिल गोपीनाथ मुंडेंची आठवण सांगितली.यावेळी पुढे बोलताना पंकजाताई म्हणाल्या, ४ जून ही आपल्या

◀◀ पान २ वर

# भाजपला सत्तेची गुर्मी अन् गैरवापर; बीडकरांनो हिसका दाखवा -पवार

बीड । प्रतिनिधी

नरेंद्र मोंदीचे सरकार हे शेतकरी विरोधी असून त्यांना सत्तेची गुर्मी आलेली आहे.शिवाय त्यांच्याकडे सत्तेचा गैरवापरही सुरू आहे. यामुळे भाजप सरकारला एकदा हिसका दाखविणे आवश्यक असून हा जिल्हा ते का करेल. मोंदींना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी बजरंग सोनवणे यांना निवडूण द्या, असे अवाहन जेष्ठ नेते शरद पवार यांनी केले.

बीड लोकसभा निवडणूकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग



सोनवणे यांच्या प्रचारार्थ शरद पवार यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथे प्रचार सांगता सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते अनील देशमूख, फौजीया खान, आ.राजेश टोपे, आ.संदीप क्षीरसागर, उमेदवार बजरंग सोनवणे, माजी आ.उषा दराडे, मा.आ.साहेबराव दरेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, बीड जिल्हा हा क्रांतीकारी जिल्हा आहे. क्रांतीसिंह नाना पाटील हे बाहेरचे असून याच जिल्ह्याने निवडूण दिले. त्यांनी शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची मागणी केली होती. त्यानंतरच्या काळात आपले सरकार आले आणि आम्ही शेतकऱ्यांची कर्जमाफी केली.

◀◀ पान २ वर

**राजेश टोपे :** सर्व क्षेत्रातला अनुभव असलेला कुशल संघटक, तुमचा आवाज सभागृहात बुलंद करेल, अशा बजरंग सोनवणे यांना निवडूण द्या.

**अनिल देशमूख:** भारतीय जनता पार्टीविरूध्द देशात रोष आहे. महागाई आणि रोजगाराने सामान्यांची वाट लागली. यामुळे अशा लोकांना पुन्हा सत्तेत येऊ देऊ नका.

**बजरंग सोनवणे:** बीड जिल्ह्यात प्रस्तापितांच्या विरोधात लाट निर्माण झालेली आहे. गावागावात तुतारी वाजत आहे. साहेबांच्या समोर शब्द देतो, उतणार नाही, मातणार नाही.

### मतदान केंद्रावर असणार पाळणाघर-विश्रांती कक्ष

बीड । प्रतिनिधी

शहरातील चंपावती विद्यालय बीड या मतदान केंद्राच्या ठिकाणी महिला मतदारासाठी पाळणाघर, विश्रांती कक्षाचीची पाहणी जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे, एम.एफ. कक्षाच्या प्रमुख तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगितादेवी पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. चंद्रशेखर केकाण यांनी पाहणी केली.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.९ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ४४.०० क्विंटल | २,२५० | २,६७० | २,३६३ |
| ज्वारी/हायब्रिड: १६५.५० क्विंटल | १,७०० | ३,५८० | २,४८८ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : ८०.०० क्विंटल | ४,५०० | १०,९६३ | ९,६०७ |
| उडीद : ५.५० क्विंटल | ७,९०० | ७,९०१ | ७,९०० |
| बाजरी: ७९.५० क्विंटल | २,०८५ | २,८०१ | २,४७७ |
| चिंच/लोकल: १०.०० क्विंटल | ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| सोयाबीन: २१६.०० क्विंटल | ४,५७५ | ४,६०१ | ४,५८५ |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,६०० | ६,१०० | ५,७८७ |

### वंचितचे अशोक हिंगे यांचे आरक्षणावर शपथपत्र

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यातील हाय व्होल्टेज लढत असलेल्या बीड लोकसभा मतदारसंघात यंदा चांगलीच चूरस वाढली असून निवडणुकीत जातीय रंग दिसून येत आहे. उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांचे केंद्रस्थान असल्याने बीड जिल्ह्यात मराठा समाजही निवडणूक प्रक्रियेत सक्रीय झाला आहे. बीडमध्ये पंकजा मुंडेंना महाविकास आघाडीच्या बजरंग सोनवणेंचे आव्हान असून वंचित बहुजन आघाडीनेही येथील मतदारसंघात उमेदवार दिला आहे.



**मराठा समाजाचे मिळणार पाठबळ; मनोज जरांगेना भेटणार**

त्यामुळे, येथील निवडणूक तिरंगी होत असली तरीही थेट लढत पंकजा मुंडे

◀◀ पान २ वर

### शिवसैनिकांनी पंकजाताई मुंडे यांना भरगच्च मतांनी निवडून आणावे - जगताप, मुळूक

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब तथा लोकप्रिय खासदार मा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार आणि सचिव संजय मोरे व उपनेते अर्जुन खोतकर, संपर्कप्रमुख विजय पाटील व विधानसभा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या सूचनेवरून बीड लोकसभा महायुतीच्या उमेदवारपंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना आपल्याला विक्रमी मताधिक्याने निवडून आणायचे आहे. पक्षाचा आणि पक्षप्रमुखाचा आदेश शिरसंवाद असतो. बाळासाहेबांचे संस्कार आपल्यावर आहेत त्यामुळे आदेश पाळणारे आणि



महायुतीचा धर्म जपणारे आपण शिवसैनिक आहोत. छोटीमोठी नाराजी बाजूला सारून महायुतीचा धर्म पाळून शिंदे साहेबांच्या आदेशाचे पालन करा आणि बीड लोकसभा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना विक्रमी मताधिक्याने निवडून आणा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख

◀◀ पान २ वर

### बीएसएनएलचा टॉवर कोसळून कुटुंब उद्ध्वस्त

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर शहरात पुन्हा अवकाळी कहर शहराच्या पश्चिम बाजूस असणाऱ्या झोपडपट्टी भागात बीएसएनएलचे कार्यालय व त्या ठिकाणी बीएसएनएल चे टॉवर आहे हे टॉवर आज झालेल्या अवकाळी पावसामुळे कोलमडले भागात राहणाऱ्या तीन लहान मुले व दोन मोठी माणसे राहत असलेल्या घरावर कोसळला नागरिकांना गंभीर दुखापत झाली. या भागात राहणाऱ्या नागरिकांना बाहेर काढले.

मागील काही दिवसापासून



**एकाच कुटुंबातील तीन बालकासह दोन गंभीर जखमी**

धारूर तालुक्यात अवकाळी पावसाचा मोठ्या प्रमाणावर फटका तालुक्यातील शेतकरी सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांना

◀◀ पान २ वर

# मोदींनंतर भाजपचा पंतप्रधान कोण? केजरीवालांचा सवाल



## तुरूंगातून बाहेर येताच मोदींवर जोरदार हल्ला

नवी दिल्ली । वृत्तसेवा

आज आम्हाला विचारले जात आहे की, 'इंडिया' आघाडीचा पंतप्रधानपदाचा उमेदवार कोण? पण मी आज पंतप्रधान नरेंद्र मोदींना विचारत आहे की, त्यांच्या नंतर भाजपचा पंतप्रधान पदाचा उमेदवार कोण आहे? असा सवाल दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी शनिवारी (दि.११ मे) केला. तिहार तुरूंगातून अंतरिम जामिनावर सुटका झाल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

पत्रकार परिषदेत बोलताना केजरीवाल म्हणाले की, ५० दिवसानंतर तुम्हा सर्वांमध्ये परत आल्याने मला खूप आनंद होत आहे. कोणालाही वाटत नव्हते की,

◀◀ पान २ वर

### मोदी पुन्हा सत्तेत आल्यास विरोधकांची जेलवारी

देशात पंतप्रधान मोदी पुन्हा सत्तेत आल्यास विरोधी नेते जेलमध्ये जातील, असा दावा मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केला आहे. मोदींनी माझ्याविरोधात षडयंत्र रचले. मला जेलमध्ये पाठवले. त्यानंतर मी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देईन असे मोदी आणि सत्ताधारी भाजप सरकारला वाटत होते, पण मी हार मानली नाही, मी या दडपशाही सरकारविरोधात लढत राहिलो आणि इथून पुढेही लढत राहीन, असेही ते म्हणाले. तसेच माझ्याविरोधात ज्याप्रकारे षडयंत्र रचले गेले त्याचप्रमाणे इतर अनेक राज्यातील मुखमंत्र्यांविरूद्ध रचण्यात येत आहे. मुख्यमंत्र्यांना राजीनामा देऊन त्यांना सरकार पडायचे आहे, असा दावा देखील मुख्यमंत्री केजरीवाल यांनी केला.

cmyk

अग्रलेख

# पवारांच्या बोलण्याचा अर्थ अन्वयार्थ...

लोकसभा निवडणुकीनंतर अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील असे वक्तव्य ज्येष्ठ नेते, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) अध्यक्ष शरद पवार यांनी राजकीय क्षेत्रात खळबळ उडवून दिली. शरद पवारांच्या वक्तव्यावरून अनेक राजकीय तर्क लावले जात आहेत. काँग्रेसने या वक्तव्याचे स्वागत व समर्थन केले आहे, तर भाजप नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वक्तव्याची खिल्ली उडवली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर सर्वच प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील. प्रादेशिक पक्षांना त्यांचा पराभव लक्षात आला आहे. त्यांचे अस्तित्व टिकवायचे असेल तर त्यांना काँग्रेसमध्ये जावेच लागेल. त्यामुळे शरद पवारांची राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना काँग्रेसमध्ये विलीन होईल. त्यांचे अस्तित्व संपुष्टात येईल असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

लोकसभेची निवडणूक सुरू असताना शरद पवार यांनी केलेल्या वक्तव्यामुळे त्यांच्या हेतूबद्दल संशय व्यक्त केला जात आहे. शरद पवार यांना उद्धव ठाकरे यांची मशाल विझवायची आहे का, अशी शंकाही व्यक्त केली जात आहे. लोकसभा निवडणुकीचे दोन टप्पे अजून शिल्लक असताना पवार यांनी केलेल्या या वक्तव्यामुळे मतदारांच्या मनात ठाकरे गटाबद्दल संभ्रम निर्माण झाल्याने ते त्यांना मतदान करणार नाहीत. परिणामी ठाकरे यांचे अनेक उमेदवार पडतील आणि तसे झाले तर मशालच विझेल अशी भीती व्यक्त केली जात आहे. शरद पवारच ठाकरे गटाला संपवायला निघाले आहेत असेही बोलले जात आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे गटाला घातक ठरणारे वक्तव्य शरद पवारांनी नेमके का केले हा प्रश्नच आहे. महाराष्ट्राचे राजकारण आजही शरद पवारांभोवती फिरताना दिसून येत आहे. शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही काँग्रेसमध्ये विलीन होणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यावर खुलासा करताना शरद पवार म्हणाले, सहकाऱ्यांशी चर्चा केल्याशिवाय मी काहीही बोलणार नाही. आमच्या पक्षाबद्दल कोणतेही पाऊल उचलताना किंवा रणनीती ठरवताना सामूहिक पद्धतीने निर्णय घेतला जाईल. लोकसभा निवडणुकीनंतर देशासह महाराष्ट्राचे राजकारण नवे वळण घेईल याचे आता संकेत मिळू लागले आहेत. निवडणुका सुरू असताना आणि महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्यानंतर शरद पवारांचा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होईल अशी शक्यता वर्तवण्यात येत होती. त्यानंतर आता शरद पवारांनी पुन्हा एकदा प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील असे वक्तव्य केले आहे. शरद पवार यांनी आजपर्यंत केलेली अनेक वक्तव्ये आणि त्यांचे टायमिंग लक्षात घेता आताच्या वक्तव्याला निश्चितच काहीतरी अर्थ आहे. या वक्तव्याचे दोन अर्थ निघू शकतात. एक म्हणजे, पंतप्रधान मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले तरी काँग्रेसला एकत्रीकरण आणि विलीनीकरणाची मोहीम राबवावी लागेल. दुसरे म्हणजे या निवडणुकीत मोदींना सत्ता मिळाली नाही किंवा अपेक्षित यश मिळाले नाही तरी सुद्धा काँग्रेस आणि मित्रपक्षांमध्ये विलीनीकरण आणि एकत्रीकरणाची मोहीम राबवावी लागेल. लोकसभा निवडणुकीनंतर मतदारांनी कोणताही कौल दिला तरी देशातील विविध प्रादेशिक पक्ष काँग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र येण्याची प्रक्रिया सुरू होईल असेच शरद पवारांना म्हणायचे आहे असे दिसते. गत काही वर्षांपासून भाजप ज्या प्रकारचे प्रभावशाली राजकारण करत आहे त्याला तोडीस तोड उत्तर द्यायचे असेल तर काँग्रेससारख्या एखाद्या राष्ट्रीय पक्षाच्या नेतृत्वाखालीच उत्तर देणे शक्य होणार आहे याची जाणीव पुन्हा एकदा करून देण्याचे काम शरद पवारांनी केले आहे. काही दिवसांपूर्वी पृथ्वीराज चव्हाण यांनीही अशाच प्रकारचे मत व्यक्त केले होते. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला चांगले यश मिळाले तर या प्रयोगाला आणखी वेग येण्याची शक्यता आहे. ऐन निवडणुकीच्या कालावधीत शरद पवार यांच्यासारखा ज्येष्ठ नेता जेव्हा एखादे वक्तव्य करतो तेव्हा त्या विधानास निश्चितच खूप महत्त्व असते.

# पंकजाताई निवडून आल्यावर केंद्रात मंत्री बनणार!

## फडणवीस, अजितदादा, धनुभाऊ, जानकर यांचे संकेत

बीड । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी आता अंतिम टप्प्यात आली असून प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. बीडची निवडणुक पंकजाताई मुंडे यांच्यासाठी प्रतिष्ठेची बनली असून त्या निवडूण आल्यावर केंद्रात मोदी सरकारमध्ये पहिल्या पाचमध्ये मंत्री बनतील, असे संकेत भाजप नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, धनंजय मुंडे, महादेव जानकर यांनी दिले आहे. त्यामुळे मंत्री हवा की साधा खासदार अशी चर्चा आता मतदारांमध्ये सुरु झाली आहे.

बीड लोकसभा निवडणुक महायुती आणि महाविकास आघाडीने प्रतिष्ठेची केली आहे. या निवडणुकीला जातीय रंग आल्याने राजकीय वातावरण तापलेले आहे. मराठा समाज आघाडीचे बजरंग सोनवणे यांच्यासोबत तर महायुतीच्या पंकजाताई मुंडे यांच्या बाजूने ओबीसी समाज आहे. या निवडणुकीला ऐवढा जातीय रंग आला आहे की, दुसऱ्या समाजातील लोकांना बोलणे सुध्दा



अनेकांनी बंद केले आहे. प्रचारासाठी गेल्यावर अनेकांना वाईट अनुभव येत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे विकासाच्या मुद्दयाऐवजी वेगळ्याच समिकरणावर ही निवडणुक लढवली जात आहे. मतदार मात्र उमेदवार हा नेमका कसा असावा? त्याची राजकीय उंची कशी आहे? जिल्ह्याचा तो विकास करण्यास सक्षम आहे का? या विषयी आपसात चर्चा करीत आहेत. त्यानुसार पंकजाताई मुंडे आणि बजरंग सोनवणे यांची राजकीय उंची किती आहे, याचाही मतदार आता विचार करणार असल्याचे म्हटले जात आहे. यातच पंकजाताई मुंडे या निवडूण आल्यावर त्या मोदी सरकारमध्ये पहिल्या पाचमध्ये मंत्री असतील, असे संकेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, धनंजय मुंडे आणि महादेव जानकर यांनी दिले आहे. शनिवारी वेगवेगळ्या सभांमध्ये बोलताना या नेत्यांनी पकजाताई या केंद्रात मंत्री बदतील, असे जाहीरपणे सांगितले आहे. त्यामुळे मंत्री होणाऱ्या उमेदवाराला मतदान करायचे की फक्त खासदार होणाऱ्या उमेदवाराला करायचे, अशी चर्चा मतदार आता करु लागले आहेत.

# तीसरी खर्च तपासणी १२ मे रोजी खर्च निरीक्षक करणार निवडणूक लेखांची तपासणी



बीड । प्रतिनिधी

निवडणूक खर्च निरीक्षक सुसांता कुमार बिस्वास हे तीसरी निवडणूक खर्च लेखांची तपासणी रविवार दिनांक १२ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात करणार आहेत. अशी माहिती निवडणूक खर्च संनियंत्रण कक्षाच्यावतीने कळविण्यात आली आहे.

३९ बीड लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक १३ मे रोजी मतदान होणार आहे. त्या अनुषंगाने लोकसभा निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांना खर्चाची लिखित नोंद ठेवावी लागते.

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार या लेखांची तपासणी निवडणूक खर्च निरीक्षक यांच्याकडून मतदान होण्यापूर्वी तीन वेळा करावी लागते. त्याप्रमाणे यापूर्वी ४ व ८ मे रोजी करण्यात आलेली आहे.

उमेदवारांना नोंदवही दिलेली असून त्यांनी केलेला खर्च व्यवस्थितरित्या लिहावा असे अपेक्षित आहे. लिहिलेल्या नोंदी तपासून खर्च निरीक्षकाच्या स्वाक्षरी घेणे हे उमेदवार अथवा उमेदवाराचे प्राधिकृत प्रतिनिधी यांचे काम असते. यात तफावत असल्यास उमेदवारांना नोटीस जारी करण्यात येते. खर्चाच्या नोंदी नीट लिहाव्या यासाठी मार्गदर्शनही केले जाते. यापूर्वी प्रशिक्षणाद्वारे नोंदी कशा घ्याव्या हे सांगण्यात आलेले आहे. रविवार दिनांक १२ मे रोजी तिसरी खर्च तपासून जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात सकाळी १० ते सांय. ५ वाजता खर्च निरीक्षक सुसांता कुमार बिस्वास हे करणार आहेत. यापूर्वी ज्या उमेदवारांनी खर्चाची तपासणी केलेली नसेल त्या सर्व उमेदवारांना खर्च तपासणी करून घेण्याची कायद्याने बंधनकारक आहे.

पान १वरून...

## ज्यादिवशी साहेबांवर अंत्यसंस्कार

निकालाची तारीख आहे, ४ जूनला याच हातांनी मी मुंडेसाहेबांचे अंत्यसंस्कार केले आहेत. मुंडे साहेबांची सहानुभूती म्हणून मी तुम्हाला मतदान मागत नाही. मुंडे साहेबांकडे बघून मला मत द्या, असेही कुठं म्हणणार नाही. मी जी कहानी सुरू केली होती, त्या कहानीला पूर्ण करण्यासाठीच ४ जूनला निकाल आहे, असे मला वाटतं. मला विधानसभा न मागता मिळाली, मला लोकसभा न मागता मिळाली. मुंडेसाहेब या जिल्ह्यात, परळीमध्ये सत्कार घ्यायला येऊ शकले नाही, माझ्या लोकसभेमध्ये जाण्याने, तो सत्कार घेण्यासाठीच हा ४ जूनला निकाल आहे, असे मला वाटते, असे म्हणत पंकजा मुंडेंनी बीडमधील जनतेला भावनिक साद घातली.

**उदयनराजे भोसलेंनी उडवली कॉलर**

सभेतील भाषणादरम्यान उदयनराजे महाराज भोसले यांनी आपल्या स्टाईल मध्ये कॉलर उडवून ही प्रचार सभा नाही तर विजयी सभा आहे, असा विश्वास व्यक्त करताना उपस्थित त्यांना तुम्हाला वाकून नमस्कार करतो परंतु माझी भगिनी पंकजाताई मुंडेला प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

## तुम्हाला माझी अन् छत्रपती

**तिला येत्या १३ तारखेला भरघोस मतदान करून विजयी करा. स्थिर सरकार सत्तेवर असते त्यावेळीच आपल्या भागाचा विकास होत असतो. तुम्ही सर्वजण सज्ञान आहात, तुम्हाला मताचा अधिकार आहे त्यामुळे कृपा करून माझ्या भगिनी पंकजाताईला निवडून द्या, अन्यथा मी राजीनामा देतो आणि पंकजाताईला तिकडून निवडून आणतो असे सांगत छत्रपती उदयनराजे महाराज भोसलेंनी कडा येथील जाहीर सभेत मतदारांना पंकजाताईला निवडून देण्याचे आवाहन करत भावनिक साद घातली.**

**शरद पवार मराठा आरक्षणावर का बोलत नाहीत धनंजय मुंडे यांचा हल्लाबोल; पुष्पा सिरीजही येणार**

शरद पवार हे मराठा आरक्षणावर का बोलत नाहीत, त्यांनी त्यांची भुमिका जाहीर करावी, असा हल्लाबोल करीत धनंजय मुंडे म्हणाले, खर तर ही लोकसभेची निवडणूक आहे. मात्र, ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर लढली जात नाही. पुष्पा २ आला पुष्पा ३ कधी येणार? घाबरु नका आता वन, टू नाही तर सिरीज येणार आहे. नेटफ्लिक्सवर येणार काळजीच करायची नाही, असे म्हणत मंत्री धनंजय मुंडे यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना टोला लगावला. बीडमध्ये पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ महायुतीची सभा पार पडली. यावेळी ते बोलत होते.

## भाजपला सत्तेची गुर्मी

आता मोदीकडे सबंध हिंदूस्थानची सत्ता आहे.पण शेतकऱ्यांसाठी ते काही करत नाहीत. उलट शेतकरी मोर्चा काढत असतील, वर्षे-वर्षे आंदोलन करत असतील तर त्यांच्यावर लाठीहल्ला करतात. त्यांचे हाल-हाल करतात. नरेंद्र मोदीचे सरकार हे शेतकरी विरोधी असून त्यांच्या हातात पुन्हा सत्ता देऊ नका. या सरकारला शेतकऱ्यांचा हिसका दाखवून द्या, अलिकडे दडपशाही सुरू झाली आहे. दिल्लीत चांगले सरकार चालविणारे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना जेलमध्ये घातले. सत्तेची गुर्मी आणि गैरवापर या सरकारकडून सुरू आहे. यांच्या सत्ता इतकी डोक्यात गेली आहे की कोणी टिका केली तर त्यांना सहन होत नाही. यामुळे मोदींना मदत होईल, असे काम मतदानातून करू नका. त्यांना रोखण्यासाठी बजरंग सोनवणेंना निवडूण द्या, या दुष्काळी भागात ऊसाला चांगला भाव देणाऱ्यांना विजयी करा, असे अवाहनही पवार यांनी केले.

**कोण काय म्हणाले..**

संदीप क्षीरसागर: बीड जिल्हा हा शरद पवार यांच्या विचाराचा आहे. ज्यांनी आपल्याला सोडले त्यांना परत घेवू नका, आपली सत्ता येणार असून बजरंग सोनवणे यांना निवडूण आणा.

सय्यद सलिम: पालकमंत्री म्हणतात जातीवाद करू नका, पण त्यांच्याच समोर मोदींनी मुस्लिमांबाबत बोलून जातीयवाद केला.

सुरेश नवले: ७५ वर्षाचा तरूण सेनानी महाविकास आघाडीचे नेतृत्व करत आहे. याच बळावर भाजपचा तंबू हवेत फेकला जाईल. परळीची मक्तेदारी मोडीत काढून बजरंगला खासदार करा.

गणेश वरेकर: उध्दव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांना पायऊतार व्हावे लागले. त्यावेळी शिवसैनिकांच्या डोळ्यात पाणी होते. त्या पाण्याचा बदला घेण्याची वेळ आलीय.

उत्तम जाणकर: भाजपवाले विकास केल्याचे सांगतात. तर मग मोदींना माळसिरसच्या बाजारात फिरण्याची का वेळ आली. ज्यांनी धरगर समाजाला आरक्षण दिले नाही, त्यांच्या हातात आपली काठी न देता, त्यांच्या पाठीत काठी घाला.

**लाव रे तो व्हिडीओ...**

अनिल देशमूख यांनी मोदींनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू अशी गॅरंटी दिली होती. त्याबाबत 'लाव रे तो व्हिडीओ' म्हणत मोंदीचा व्हिडीओ दाखवत त्यांनी कोणतेच आश्वासन पुर्ण केले नसल्याचे म्हटले.तर देवेंद्र फडणविस यांचाही 'अजित दादा चक्की पिसींग, पीसींग' अस म्हणतानाचा व्हिडीओ दाखवला.

पाच हजाराचा चेक दिला

मजदूर सेनेच्या वतीने ५ हजार रूपयांचा चेक बजरंग सोनवणे यांना देण्यात आला. तर आष्टीतील अनेकांनी या कार्यक्रमात प्रवेश केला. तर दिल्लीच्या तक्ताला लई भारी, शरद पवार, हे गित सरकटे यांनी गायीले.

## वंचितचे अशोक हिंगे

आणि बजरंग सोनवणे यांच्यातच असणार आहे. मात्र, बीडमध्ये जरांगे पॅटर्नही लक्षवेधी आहे. त्यातच, जरांगे यांनी मराठा आरक्षण देणाऱ्या उमेदवारांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले होते. आता, वंचितच्या उमेदवाराने थेट स्टँप पेपरवरच आरक्षणाबाबत लिहून दिले आहे.

बीड लोकसभा निवडणुकीचा प्रचार आज अंतिम टप्प्यात आला असून सायंकाळी ६ वाजता येथील प्रचाराच्या तोफा तंडावणार आहेत. त्यामुळे, पंकजा मुंडेंसाठी आज स्वत: उदयनराजे भोसले व उपमुख्यमंत्री अजित पवार यांची परळीत सभा पार पडली. तर, शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत बजरंग सोनवणेंच्या प्रचारासाठी सभा होत आहे. त्यातच, वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराने नवा ट्विस्ट निर्माण केला आहे. वंचितच्या उमेदवाराने थेट बॉण्ड पेपरवरच आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करणारे शपथपत्र तयार केलं असून ते प्रसिद्धही करण्यात आले. विशेष म्हणजे हे शपथपत्र मनोज जरांगे पाटील यांना सादर करण्यात येणार असल्याचंही उमेदवाराने स्पष्ट केले आहे.

बीड लोकसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी मराठा, धनगर आणि मुस्लिम समाजाबाबतच्या आरक्षणाची हमी थेट बॉण्डवर लिहून जाहीर केली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी जो उमेदवार आरक्षणाबाबत आपली भूमिका स्पष्ट करेल, त्याच्या पाठिशी मराठा समाजा उभा राहील असं म्हटले होते. त्यानंतर आता वंचितचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी आपली भूमिका बॉण्डवर लिहून देत स्पष्ट केली. तसेच, हे शपथपत्र जरांगे पाटलांपर्यंत पोहोचविणार असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे, बीडच्या निवडणुकीत नवाच ट्विस्ट पाहायला मिळाला आहे. आता, जरांगे पाटील यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले असून हे शपथपत्र जरांगे स्वीकारतील का, मराठा समाज वंचित बहुजन आघाडीच्या पाठीशी जाईल का, असे प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहेत.

## यंदा भरपूर पाऊस

अक्षय्य तृतीयेचा मुहूर्तावर गट मांडणी केल्यानंतर शनिवार (दि.११) सूर्योदयापूर्वी वाघ महाराजांनी पीक पाण्याचा अंदाज वर्तविला. मात्र, यावर्षी सध्या आचारसंहिता सुरू असल्या कारणाने कोणतेही राजकीय भाकीत या ठिकाणी वर्तवण्यात आले नाही. यावर्षी बऱ्यापैकी पाऊस पडणार आहे. यात प्रामुख्याने पहिला महिना (जून) कमी पाऊस तर बरसणार असून, दुसऱ्या महिन्यात (जुलै) सर्वसाधारण पाऊस पडणार आहे. तिसरा महिना (ऑगस्ट) जास्त आणि भरपूर पाऊस असणार आहे. तर चौथ्या महिन्यात (सप्टेंबर) अवकाळी पावसासह बऱ्यापैकी पर्जन्यमान राहणार असल्याचे भेंडवळच्या घटमांडणीच्या भाकितात सांगण्यात आले.

## चौथ्या टप्प्याचा प्रचार

मावळ, पुणे, शिरूर, नगर, शिर्डी, बीड या ११ मतदारसंघांचा समावेश आहे. यापैकी नंदुरबार हा मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी, तर शिर्डी हा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी प्रचार सभा घेतलेल्या नंदूरबारमध्ये भाजपच्या विद्यमान खासदार डॉ. हीना गावित यांच्या विरोधात काँग्रेसचे गोवाल पाडवी हे मैदानात आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उद्धव ठाकरे यांनीही शुक्रवारी छत्रपती संभाजीनगर मतदारसंघात प्रचारसभांना संबोधित केले. या मतदारसंघात एमआयएमचे विद्यमान खासदार इम्तियाज जलील, महायुतीचे संदिपान भुमरे व महाविकास आघाडीचे चंद्रकांत खैरे यांच्यात मुख्य लढत आहे. अहमदनगरमधील भाजपचे विद्यमान खासदार डॉ. सुजय विखे आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे निलेश लंके यांच्यात लढत आहे. जळगाव येथे भाजपच्या स्मिता वाघ आणि शिवसेना ठाकरे गटाचे करण पवार यांच्यात तर रावेर येथे भाजपच्या रक्षा खडसे व राष्ट्रवादी शरद पवार गटाचे श्रीराम पाटील यांच्यात लढत आहे. शिर्डीत शिंदे गटाचे विद्यमान खासदार सदाशिव लोखंडे, शिवसेना ठाकरे गटाचे भाऊसाहेब वाकचौरे आणि वंचित बहुजन आघाडीच्या उत्कर्षा रूपवते यांच्यात तिरंगी लढत आहे. बीड लोकसभेत महायुतीच्या पंकजा मुंडे उभ्या असून, त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीचे शरद पवार राष्ट्रवादी गटाचे बजरंग सोनवणे उभे असून, याठिकाणी काट्याची टक्कर होत आहे. मावळ येथे शिवसेना शिंदे गटाचे श्रीरंग बारणे आणि शिवसेना ठाकरे गटाचे संजोग वाघेरे पाटील यांच्यात लढत आहे. पुणे लोकसभा मतदारसंघात भाजपचे मुरलीधर मोहोळ, काँग्रेसचे रवींद्र धंगेकर आणि वंचितचे वसंत मोरे यांच्यात तिरंगी लढत आहे. शिरूर येथे दोन्ही राष्ट्रवादी आमने-सामने असून अजित पवार गटाकडून शिवाजीराव आढळराव पाटील आणि विद्यमान खासदार व शरद पवार गटाचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे हे लढत आहेत.

## मोदींनंतर भाजपचा पंतप्रधान कोण?

निवडणुकी दरम्यान मी कारागृहामधून बाहेर येईन; पण हनुमानाच्या कृपेने मी आज लोकसभा निवडणूक प्रचारासाठी तुमच्यात आहे. त्यामुळे आपल्याला मिळून आपल्या देशाला हुकूमशाहीपासून वाचवायचे आहे, मी माझ्या सर्व शक्तीनिशी लढेन, मला देशातील १४० कोटी जनतेच्या पाठिंब्याची गरज आहे, असे आवाहन देखील केजरीवाल यांनी केले. मोदींबाबत बोलताना केजरीवाल म्हणाले, आज पंतप्रधान जनतेकडे त्यांच्या नावाने मतं मागत आहेत. ते सप्टेंबरमध्ये वयाची ७५ वर्षे पूर्ण करत असल्याने पक्षातून निवृत्त होत आहेत. त्यामुळे पीएम मोदी हे स्वत:साठी नाहीत तर गृहमंत्री अमित शहा यांच्यासाठी जनतेकडे मते मागत असल्याचे केजरीवाल म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनीच पक्षात नियम केला आहे की, पक्षातील उमेदवारांचे वय ७५ झाल्यानंतर त्याने निवृत्ती घ्यायची. या नियमानुसार आत्तापर्यंत लालकृष्ण अडवाणी, सुमित्रा महाजन यांना पीएम मोदींच्या नतृत्त्वाखालील भाजपने आज घरी बसवले आहे. पीएम मोदी जर पुढील वर्षी पक्षातून निवृत्त होत असतील तर आज लोकसभा प्रचारसभेमध्ये ते ज्या गॅरंटी देत आहेत. त्या कोण पूर्ण करणार? असा सवाल देखील केजरीवाल यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केला. आम आदमी पार्टीला संपवण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोणती कमी केली नाही. आमचा पक्ष नाही तर एक विचार आहे. तुम्ही जेवढे मला आणि आमच्या पक्षाला संपवण्याचा प्रयत्न कराल तेवढा पक्ष मोठा आणि मजबूत होईल, असा विश्वासही केजरीवालांनी व्यक्त केला.

## शिवसैनिकांनी पंकजाताई मुंडे यांना

अनिलदादा जगताप आणि सचिनभैय्या मुळूक यांनी आपल्या शिवसैनिकांना केले. बीड लोकसभा निवडणुक २०२४ महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिनभैय्या मुळूक यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्हा शिवसेनेची काल शनिवारी दि.११ रोजी दु. १.०० वाजताच्या दरम्यान बीड शहरातील बार्शी रोडवरील हॉटेल ग्रँड यशोदा येथे बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये येत्या दोन दिवसात जीवाचे रान करुन महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना विजयी करण्याचा निश्चय शिवसैनिकांनी घेतला आहे.

याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी आपल्या पदाधिकारी यांच्याशी संवाद साधला. ते म्हणाले की, पक्षाचा आणि शिंदे साहेबांच आदेश शिरसंवाद आहे. त्यामुळे महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना निवडून द्यायचं आहे. आदेशाचं पालन करणारा शिवसैनिक आहे हा आजावरचा इतिहास आहे. पंकजाताई मुंडे यांना भरगच्च मतांनी विजयी करून लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांना शिवसैनिकांडून श्रद्धांजली अर्पण करायची आहे. पंकजाताई यांना भरगच्च मतांनी निवडून आणून आपल्या पक्षाच्या आदेशाचे पालन करायचे आहे असे ते म्हणाले. यादरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी सांगितले की, शिंदे साहेबांनी सांगितले की, युतीचा धर्म तुटला नाही पाहिजे. कुठली उणीव जर मित्र पक्षाकडून आपल्याला भासली असेल तर येणाऱ्या काळात ती उणीव मी भरून काढेल. युतीचा धर्म पाळण्यासाठी शिंदे साहेब रात्रंदिवस पळतायत. जर आपला नेता युतीचा धर्म पाळण्यासाठी अहोरात्र पळत असेल तर आपण देखील एक शिवसैनिक म्हणून आपल्या नेत्यासाठी महायुतीच्या उमेदवार पंकजाताई यांना निवडून आणायसाठी प्रयत्न करावेत.बैठकीसाठी बीड, माजलगाव, केज व परळी विधानसभा मतदारसंघातील उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहर प्रमुख, उपतालुकाप्रमुख , उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख, सर्कल प्रमुख शाखाप्रमुख व शिवदूत तसेच, महिला आघाडी, युवा सेना, अल्पसंख्याक आघाडी, वैद्यकीय मदत कक्ष ,शेतकरी संघटनांचे सर्व पदाधीकारी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जिल्हा संघटक सुनील सुरवसे यांनी केले.

## बीएसएनएलचा टॉवर

झाला आहे त्यातच दिनांक ११ मे रोजी दुपारी चार च्या सुमारास वादळी वाऱ्यासह पावसाने परत नुकसान केले.किल्ले धारूर शहरामध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस तब्बल एक तास होता या पावसामध्ये धारूर शहरातील झोपडपट्टी भागात नागरिकांच्या घरावर बीएसएनएलचे टॉवर पडले त्यामुळे त्या ठिकाणी नागरिकांना गंभीर जखमा झाल्या जखमी मध्ये.राधा कौर(८) , पुनम कौर (६), दस्मिता कौर,(५), गंगा कौर (२२), योगेंदरसिंग (२५)यांना उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय या ठिकाणी पाठवण्यात आले आहे. धारूर शहरातील शिंनगारे गल्लीतील लोकवस्तीत असणार लाईटचे हाय मॅक्स टॉवर मोडून पडला सदैवाने कुठलीही जीवित हानी झाली नाही.धारूर ते आडस रस्त्यालगत असणारे मोठे बाभळीचे झाड वादळी वाऱ्यामुळे जमीन दोस्त होऊन रस्त्यावर पडले सुदैवाने काही हानी झाली नाही परंतु या भागावरील वाहतूक बराच वेळासाठी ठप्प झाली. झाली झाली होती.

पान ६ वरून...

## बजरंग सोनवणेंना केज तालुका

पप्पु रोडे, बालाजी चादर, कृष्णा रोडे, पप्पु लांडगे, अमोल रोडे, लखन डुकरे, अमोल सोदागर, रवि डुकरे, मोनु गाढवे, विजय शिंदे, बबलु गायके, विजय वाकळे, संजय गाढवे, गजेंद्र रोडे, आदित्य गायके, सचिन सोदागर, माऊली रोडे, बालाजी शेवाळे, मनोज कदम, शुभम लोंढे, कृष्णा डुकरे, गजानन कोल्हे, शुभम निंगुळेयांसह केज तालुक्यातील सकल धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जरांगे पाटलांच्या मागण्या

नाहीत असा आरोप त्यांनीही मुंडेंवर केला.

या सभेत बोलताना सोनवणे म्हणाले,''माझ्या शेतीत काय पिकते हे मागच्या १५ वर्षांत पाहिले नाही का? माझ्यावर चोर म्हणून आरोप करतात. मात्र खरे चोर हेच आहेत. यांनी शेतकऱ्यांचे पैसे चोरले आहेत. एकाला गाडीत गांजा टाकून तुला संपवेन अशी ते धमकी देतात. एका सभेत जमलेले सर्व नेते फक्त बजरंग सोनवणे या एकाच माणसाबद्दल बोलतात. आत्तापर्यंत बीड जिल्ह्याचे मागासलेपण हे लोक घालवू शकले नाहीत. अशा लोकांनी आमची लायकी काढण्याचा अधिकार नाही,'' असं सोनवणे म्हणाले.दरम्यान, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनीही पिक विम्याबाबत गंभीर आरोप केला. देशमुख म्हणाले, ही लढाई परळी मतदारसंघाची नाही किंवा फक्त बीड जिल्ह्याची राहिलेली नाही. ही लढाई कोण्या पुढाऱ्यांच्या, आमदाराच्या, खासदाराच्या हातात नाही. ही लढाई आता सर्वसामान्य जनतेने हातात घेतली आहे. २०२० साली येथील शेतकऱ्यांनी २१०० कोटींचा विमा भरला. मात्र कंपनीसोबत लागेबांधे करून येथील शेतकऱ्यांच्या हक्काचा विमा पळवण्याचे काम येथील पुढाऱ्यांनी केल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

## लोकशाही टिकवण्यासाठी

बप्पांना प्रचंड मताने विजयी करा असे अवाहन प्रदिप थोरवे यांनी कुंबेफळ येथे बोलताना केला. यावेळी खुंटेफळ,कुंबेफळ,बाळेवाडी,सोलापुरवाडी,पुंडी, घोंगडेवाडी,बोडखा,बोरोडी, होतोळोन, ठोंबळसांगवी,पिंपळा, धनगरवाडी साकत, खुंटेफळ वा. या गावांना भेटी दिल्या.यावेळी शिवाजी थोरवे, श्रीकांत नवसुपे, गनेश थोरवे, राजु मोहीते व महाविकास आघाडीचे अनेक पदाधीकारी व गावकरी ऊपस्थीत होते.

## पंकजाताई मुंडे यांना

उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे,वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पांडुरंग बापू अंडील,भारतीय जनता पार्टीचे वडवणी तालुका उपाध्यक्ष महादेवजी सावंत,युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष ईश्वरजी तांबडे हे होते तर पहाडी पारगाव येथील,कॉर्नर बैठकीला गावचे माजी सरपंच वशिष्ठभाऊ मुंडे,सेवा सहकारी सोसायटीचे संचालक पंडितभाऊ साक्रुडकर,नामदेव अंडील,डॉ.अशोक मुंडे,गावचे विद्यमान उपसरपंच हनुमंत बप्पा मुंडे,राष्ट्रवादीचे युवा नेते तथा संचालक सटवा अंडील,नामदेव अण्णा मंत्रे,विलास तात्या मुंडे, आसाराम मुंडे,आत्माराम अण्णा मुंडे,सुदाम अंडील,बापुराव मुंडे,बब्रुवान रुद्रे,बंडू बिल्पे,युवा नेते अनंत बिल्ले यांच्यासह गावातील व तालुक्यातील भारतीय जनता पार्टी,शिवसेना,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष,मनसे व घटक पक्षाचे तसेच वेगवेगळ्या समाजाचे मोठ्या संख्येने कार्यकर्ते या दौऱ्या दरम्यान उपस्थित होते या दौऱ्याला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि.१२ मे २०२४


## मतदानादिवशी माजलगाव येथील मोंढा बंद

माजलगाव । प्रतिनिधी

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी दिनांक १३ मे रोजी मतदान होणार आहे यामुळे सोमवारी माजलगाव बाजार समितीचे नवीन मोंढा फुले पिंपळगाव येथील सर्व शेतीमालाचा जाहीर लिलाव (बीट )बंद राहील याची तालुक्यातील शेतकरी बांधवांनी नोंद घ्यावी असे आवाहन बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे सोमवार दिनांक १३ मे २०२४ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी होत असलेल्या निवडणुकीसाठी जास्तीत जास्त मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा या दृष्टिकोनातून माजलगाव परिसरातील शेतकरी बांधवांनी १३ मे सोमवार रोजी मोंढा बंद असल्याने शेतकरी बांधवांनी आपला शेतीमाल विक्रीसाठी आणू नये असे आवाहन बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे

# बीडजवळील उड्डाणपूल, स्लिप रोडचा प्रश्न मार्गी लावणार -नितीन गडकरी

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मागणीची घेतली दखल

बीड । प्रतिनिधी

शहराजवळील उड्डाणपुलांसह स्लिप रोडचा प्रश्न मार्गी लावणार असल्याची घोषणा रस्ते, वाहतूक व दळणवळण केंद्रीय मंत्री ना.नितीन गडकरी यांनी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी ना.नितीन गडकरींना विविध मागण्यांचे निवेदन दिले. या मागण्यांची दखल घेऊन ना.गडकरी यांनी ही घोषणा केली. भाजप महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ केंद्रीय मंत्री ना.नितीन गडकरी यांची माजलगाव येथे शुक्रवारी (दि.१०) जाहीर सभा झाली. यावेळी व्यासपीठावर ना.गडकरी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी पंकजाताई मुंडे यांच्यासह भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आ.प्रकाश सोळंके, आ.लक्ष्मण पवार आदींची उपस्थिती होती.



डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले की, सोलापूर-धुळे (एन.एच.५२) महामार्गावर बीडजवळ छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने महालक्ष्मी चौक व सोलापूरच्या दिशेने छत्रपती संभाजी महाराज चौक येथे अपघात वाढले आहेत. प्रवाशांच्या हिताच्या दृष्टीने व दळणवळणच्या दृष्टीने या दोन्ही ठिकाणी उड्डानपूल करणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबत रस्ते, वाहतूक व दळणवळण विभागाला यापूर्वीही निवेदन दिले आहे. तसेच, बीड बायपासकडून तेलगावकडे जाणारा आणि पिंपळनेरकडे जाणारा स्लिप रोड करणे गरजेचे आहे. हा बीडकरांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न सोडवावा, अशी विनंती डॉ.योगेश क्षीरसागर यांनी ना.नितीन गडकरी यांच्याकडे केली.

### डॉ.योगेश क्षीरसागरांचा सातत्याने पाठपुरावा

परळी येथे शासन आपल्या दारी कार्यक्रमात आलेले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे बीड शहराजवळील उड्डाणपुलांसह स्लिप रोडचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली होती. त्या मागणीच्या अनुषंगाने दोघांनीही रस्ते, वाहतूक व दळणवळण विभागाकडे शिफारस केली होती. तसेच, पंकजाताई मुंडे यांनी हा प्रलंबित प्रश्न ना.नितीन गडकरींच्या कानावर घातला. उड्डाणपूल, स्लिप रोडसाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांचा सातत्याने सुरू आहे. त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळत आहे.

दरम्यान, मागणीची दखल घेऊन ना.गडकरी यांनी आपल्या भाषणात बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्या, मी बीडजवळील उड्डाणपुलासह स्लीप रोडचा प्रश्न मार्गी लावणारच, अशी घोषणा त्यांनी केली.

## दहशत पसरविणाऱ्या गुंडांना लगाम घाला नसता १५ मे पासून औषधी दुकान बंद

### केमिस्ट असो. व व्यापारी महासंघांचे धीरजकुमार यांना निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

दि ९ मे रोजी शहरातील जुनं बस स्थानक, दबडगावकर कॉलनी हनुमान चौक येथे दहशत माजवून सर्व सामान्य माणूस, महिलाना मारहाण करणारे तसेच संजय एजन्सी या होलसेल औषधी दुकान मध्ये जाऊन तोडफोड करून कामगारांना मारहाण करणारे गुंड यांना दोन दिवसात अटक करून कडक कारवाई करावी नसता दि १५ मे पासून माजलगाव शहरातील सर्व औषधी दुकान बेमुदत बंद ठेवण्याचा इशारा माजलगाव केमिस्ट असोसिएशन व माजलगाव तालुका व्यापारी महासंघाने उपविभागीय पोलिस अधिकारी बी धीरजकुमार यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे

दिलेल्या निवेदनत मागील वर्षभरात माजलगाव शहरात वय वर्ष १८ ते ३० मधील काही गुंड प्रवृतीचे युवक वेगवेगळ्या प्रकारची नशा करून शहरतील वेगवेगळ्या दुकानावर जाऊन हुज्जत घालणे, फुकट सामान मागणे,दुकानातील कामगारांना मारहाण करणे, दुकानातील साहित्याची तोड फोड करणे असे प्रकार नित्याचे होऊ लागले आहे. महिना ही उलटत नाही तोपर्यंत नवीन प्रकार घडत आहे.०९ मे रोजी दबडगावकर कॉलनी येथील होलसेल औषधी दुकान संजय एजन्सी येथे पोलिस रेकॉर्ड वर गुन्हेगार असलेले सोन्या दराडे व बबू शेख भांगरवला या दोन युवकांनी काहीही कारण नसताना रस्त्यावर गोंधळ घालत असतानाच अचानक दुकानात घुसून दुकानातील कामगारांना फायटर या शस्त्रने व दुकानातील लोखंडी स्टूल ने मारहाण करून जखमी केले.कॉप्युटर प्रिंटर व मोबाईल फोडला अनेकांच्या खिशातून पैसे काढून घेतले रस्त्यावर ही अनेकांना मारहाण केली.यामुळे केमिस्ट व व्यापारी तसेच दुकानातील कामगार सामान्य माणूस ही दहशतीखाली आहे. या वाढत्या गुंडगिरीस वेळीच आळा घालून व्यापाऱ्यांना सरक्षण द्यावे. तसेच या प्रकारणातील दोन्ही आरोपीना तात्काळ अटक करून प्रतिबंधात्मक कारवाई करावी नसता १५ मे पासून शहरातील सर्व औषधी दुकान बंद ठेवण्याचा केमिस्ट असोसिएशन व व्यापारी महासंघाने वेगवेगळ्या दिलेल्या निवेदनात इशारा दिला आहे. व्यापारी महासंघांचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासानी, केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष विनोद शर्मा व सर्व पदाधिकारी यांनी हे निवेदन उपविभागीय पोलिस अधिकारी बी धीरजकुमार यांना दिले.यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेश चिटणीस दयानंद स्वामी,माहेश्वरी सभेचे अध्यक्ष तथा पत्रकार उमेशकुमार जेथलिया हेही उपस्थित होते.

## जातीची लेकरं मोठी करा,स्वार्थासाठी जातीच्या विरोधात जाऊ नका

» मनोज जरांगे पाटील यांचा मराठा आमदारांना इशारा

» नसता येणाऱ्या विधानसभेला आम्ही मैदानात उतरू



माजलगाव

महाराष्ट्रामध्ये लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी चालू आहे.जोरदार प्रचार चालू आहे.गेल्या अनेक दिवसापासून मराठा समाजाची एकी झाली आहे.हि एकी पाहून राजकीय नेते भांबावले असून देशाचे पंतप्रधान यांना महाराष्ट्रात अनेक सभा घेण्याची वेळ आली आहे.जातीची लेकरं मोठी करा,स्वार्थासाठी जातीच्या विरोधात जाऊ नका,नसता येणाऱ्या विधानसभेला आम्ही मैदानात उतरू असा इशारा मराठा आमदारांना मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी सकल मराठा समाज बांधवांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी बोलताना दिला आहे.

श्री क्षेत्र नारायण गड येथे येत्या दि ८ जून रोजी भव्य महा विशाल सभेचे आयोजन केले आहे.या अनुषंगाने माजलगाव शहरातील काव्य हईट्स येथे सकल मराठा समाज संपर्क कार्यालयाचे उद्घाटन दि १० मे शुक्रवार रोजी रात्री ८:०० वाजता मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी पुढे बोलताना जंरागे पाटील म्हणाले की, जोपर्यंत मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण मिळत नाही व सगे सोयाऱ्यांच्या कायद्याची अंमलबजावणीचा कायदा पारित करीत नाहीत तोपर्यंत मराठ्यांचा हा लढा कायम राहाणार आहे.

मराठा समाज कधीच भाजपा विरोधात नव्हता जर भाजपाविरोधात असता तर मराठ्यांनी १०५ आमदार निवडून दिले नसते.आजपर्यंत मराठा समाजाचा राजकीय नेत्यांनी फक्त मतदाना पुरताच वापर करून घेतला व मराठा ओबीसी वाद निर्माण केला परंतु आता सर्व मराठा समाज जागृत झाला आहे.एक झाला आहे. महाविकास आघाडीने सुद्धा आम्हाला काही तुपाचे डबे दिले नाहीत परंतु त्यांनी त्रास थोडा कमी दिला आहे.या भाजपाने मात्र आताच ताजा त्रास दिला असल्याने ज्यांनी ज्यांनी मराठा समाजाच्या अरक्षणाला विरोध केला आहे त्यांना या लोकसभा निवडणुकीत असे पाडा की त्यांच्या पाच पिढ्या सुद्धा निवडणुका लढणार नाहीत.मराठ्यांनी जशी आतापर्यंत एकी दाखवली तशी यापुढे देखील मराठा समाजाने मतदानातून एकी दाखवा. अजूनही वेळ गेलेली नाही सगे सोयरे अंमलबजावणी करून कायदा पारित करा. नसता येणाऱ्या विधानसभेला आम्ही मैदानात उतरू असा इशारा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी दिला व येत्या ८ जून रोजी श्रीक्षेत्र नारायण गड येथे ९०० एकर वर होणाऱ्या देशव्यापी विशाल सभेला मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन जरांगे पाटील यांनी केले यावेळी मराठा समाज बांधवांनी मोठ्ठया संख्येने उपस्थिती लावली होता.

## गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करणे कौतुकास्पद -आ.नमिता मुंदडा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील पेशवा प्रतिष्ठान तर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भगवान श्री परशुराम जन्मोत्सव निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .समाजातील गरजू होतकरू विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण व्हावे यासाठी परशुराम विद्यार्थी सहाय्यक मंडळ यांच्या वतीने करण्यात येणारी आर्थिक मदत ही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला न्याय देण्याचे कार्य करते ,त्यामुळे परशुराम विद्यार्थी सहाय्यक मंडळ हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे मत आमदार नमिता मुंदडा यांनी व्यक्त केले .त्या भगवान श्री परशुराम जन्मोत्सवानिमित्त कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी , ॲड शोभा लोमटे ,गजानन मुडेगावकर, कल्याणी कुलकर्णी यांची उपस्थिती होती . राजकिशोर मोदी , ॲड शोभा लोमटे , गजानन मुडेगावकर यांनी यावेळी परशुराम जन्मोत्सव निमित्त शुभेच्छा दिल्या.पूजनानंतर नृसिंह वेधशाळेचे नवनाथ गुरुजी जोशी यांच्या शिष्यांनी विश्व कल्याणासाठी शांतीपठण केले. त्यानंतर परशुराम विद्यार्थी सहाय्यक मंडळ च्या वतीने एमबीबीएस तृतीय वर्षाचा विद्यार्थी पवन कुलकर्णी यास पन्नास हजार रुपयाचा धनादेश मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. पवन कुलकर्णी यास मदतीचे तिसरे वर्ष आहे. ब्राह्मण समाजाचे सामाजिक कार्य लक्षात घेता जास्तीत जास्त मतदान व्हावे ,त्याबाबत जनजागृती व्हावी यासाठी लावलेला फलक सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.

राजकरण गेले मिशीत या मराठी चित्रपटातील महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल अश्विनीकुमार मुकादम यांचा विशेष सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ संकेत तोरंबेकर प्रास्ताविक प्रा राहुल कुलकर्णी तर आभार प्रदर्शन डॉ महेश अकोलकर यांनी केले .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पेशवा प्रतिष्ठानचे श्रीकांत जोशी, शिरीष हिरळकर, विवेक बाभुळगावकर, सुजित दीक्षित,आनंद टाकळकर,अक्षय देशमुख, दीपक कुलकर्णी, सर्वेश सेलुकर केदार दामोशन ,गौरव कुलकर्णी, पार्थ कुलकर्णी,गोविंद जोशी, उमाकांत बाभूळगावकर ,दशरथ देशपांडे, अविनाश लहूरिकर, हरिभाऊ माके,राजश्री पिंपळे , प्रतीक्षा जोशी, मनीषा कुलकर्णी ,शुभांगी पत्की, प्रणिता पोखरीकर, रोहिणी जड, वर्षा मिरगे ,साधना विर्धे ,शैला अकोलकर, भक्ती अकोलकर, स्मिता भातलवंडे, अपर्णा भालेराव ,मनीषा उपळाईकर, आशा राखे, मयुरी तोरंबेकर , ज्योत्स्ना लाटकर, स्वाती बनवसकर, शुभांगी खारकर, गायत्री राडीकर ,श्रेया जोशी ,सविता मुंजे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमास मनोज लखेरा ,महादू मस्के, ॲड मकरंद पत्की, मकरंद सोने सांगवीकर ,शरयू हेबाळकर, प्रभाकर सेलमोहकर ,डॉ गोपाळ चौसाळकर, पद्माकर सेलमोकार, शरद देशपांडे, नंदकुमार देशपांडे ,रमाकांत सेलमोकर यांच्यासह समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती यांची उपस्थिती होती.

# पारधी समाजाचा मतदानावर बहिष्कार

केज । प्रतिनिधी

गायरान जमीनीमध्ये ३० ते ४० पारधी समाजाचे कुटुंब राहत आहे. या ठिकाणी पाण्याची कसलीही सोय नसल्याने पाण्यासाठी इतर ठिकाणी भटकंती करावी लगाते. या वस्तीवरील समाजाने होत असलेल्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकला असून, तसे निवेदन केज तहसीलदार यांना देण्यात आले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून गायरान जमीनीमध्ये पारधी समाजाचे ३० ते ४० कुटंब राहतात. या ठिकाणी कसल्याही प्रकारची पाण्याची सुविधा नाही. तीन ते चार कि.मी. अंतरावरून डोक्यावर हंडे घेऊन पाणी आणावे लागते. एकाही लोकप्रतिनिधीने त्यांच्या पाण्याची समस्या सोडवली नसल्याने पारधी समाजाने मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. तसे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले. या वेळी पवार, राजकुमार, सिकंदर शिंदे, लहू काळे, रामेश्वर शिंदे, बप्पाजी काळे, महादेव काळे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.



# जिजाऊ , ज्ञानराधा मल्टीस्टेट, साई अर्बनच्या सर्व ठेवीदारांना न्याय मिळवून देणार :अशोक हिंगे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात गेल्या सहा महिन्या पासून खाजगी बँका नी गोरगरीब जनतेच्या ठेवी घेऊन पळून जाण्याचे प्रकार घडल्या मुळे ठेवीदार हवालदिल झाले आहेत माँसाहेब जिजाऊ बँक, ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम अर्बन च्या सर्व ठेवीदारांना न्याय मिळवून देणार असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी ठेवीदाराच्पा बैठकीत सांगितले आहे

हिंगे पाटील पुढे म्हणाले की सहा महिन्यापासून खाजगी बँका ठेवी दराच्या ठेवी घेऊन पळून जात आहेत याबाबत कुठलाही लोकप्रतिनिधी बोलत नाही जिल्हा प्रशासनाकडे अनेक वेळा निवेदन दिली आंदोलन केली . मॉ साहेब जिजाऊ पतसंस्थे चे अध्यक्ष बबन शिंदे ठेवीदाराचे सर्व पैसे घेऊन पसार झाले होते अनेक निवेदन आंदोलन करून ठेवीदारांच्या खांदयाला खांधा देऊन मी संघर्ष उभा केला पाठीशी खंबीरपणे उभा राहिलो तेव्हा बबन शिंदे यांच्यावर गुन्हा दाखल झाला मात्र अटक झाली नाही या घोटाळ्यातील आरोपींना अंटक करण्यासाठी एस आय टी लावण्यासाठी प्रयत्न केला.



ज्ञानराधा,साईराम राजस्थानी मल्टीस्टेट गेली अनेक दिवसापासून ठेवीदारांचे पैसे देण्यास टाळाटाळ करत आहे ज्ञानराधा मल्टीस्टेट चे कुटे यांच्या कडून तारखांवर तारखा मिळत आहेत मात्र गरीब जनतेचे पैसे दिले जात नाहीत साई राम अर्बन मध्येही असे च प्रकार घडत आहेत ठेवीदराचे पैसे देण्यासाठी तारखा मागून तारखा दिल्या जातात परंतु वेळेवर ठेवी मिळत नसल्यामुळे ठेवीदार घाबरून जातं आहेत मात्र घाबरून न जाता ठेवीदारांनी वंचित बहुजन आघाडीच्या पाठीमागे उभे राहावे बीड लोकसभेत खासदार म्हणून मला संसदेत पाठवा माझ्या गॅस सिलेंडर समोरील बटन दाबून मला प्रचंड मताने विजयी करा मला मतदान रुपी आशीर्वाद द्या. गरिबांची लूट आणि बँका नां सूट हे धोरण मी थांबावतो वरील तीनही पतसंस्था मधील ठेवी मिळवून देण्यासाठी मी सदैव आपल्या सोबत राहील असे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी सांगितले वेळप्रसंगी ठेविदारांच्या न्याय मागणीसाठी ऍड.प्रकाश आंबेडकर यांच्या मार्गदर्शनानुसार प्रत्येक ठेवीदाराची याचिका उच्च न्यायालयात दाखल करून निशुल्क न्यायालयीन लढाई लढली जाईल आम्ही सत्तेत असो किंवा नसो सतत सत्यासाठी आणि न्यायासाठी संघर्ष करीत आलेलो आहे त्यामुळे येणाऱ्या काळातही सत्यासाठी आणि न्यायासाठी सदैव गोर गरीबा जनतेची साथ देणार आहे न्याय मिळवून देणारा आहे म्हणून येणाऱ्या १३ तारखेला गॅस सिलेंडर या चिन्हा समोरील बटण दाबून मला मतदान रुपी आशीर्वाद द्या व मला संसदेत पाठवा आपल्याला न्याय मिळवून देण्याची हमी देतो आसे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी सांगितले.

## बजरंग सोनवणे यांना पाटोदा तालुक्यातून मताधिक्य देणार-जाधव

पाटोदा । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना पाटोद्यात मोठे मताधिक्य देऊन निवडून देणार असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे मत राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव प्रसिद्धी पत्रकाद्वारे यांनी व्यक्त केले आहे. बजरंग सोनवणे यांच्या माध्यमातून जिल्ह्यात विकास कामे करण्यासाठी पाटोदेकरांनी आपली ताकद बजरंग सोनवणे यांच्या पाठीशी उभा करण्याचे तालुक्यातील राष्ट्रीय काँग्रेस पक्षातील पदाधिकारी कार्यकर्ते यांना तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांनी आव्हान केले आहे.



लोकसभा निवडणुकीच्या प्रचार अंतिम टप्प्यात आलेला आहे बीड लोकसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या पाठीशी अंतिम टप्प्यात सर्व क्षेत्रातील तरुण वर्गाची मोठी ताकद मोठ्या संख्येने उभा रहात आहे.मागील काही वर्षांत बीड जिल्ह्याचा विकास खुटल्याने यावेळी शेतकरी वर्गाची जान असलेल्या शेतकरी पुत्र बजरंग (बप्पा)सोनवणे यांना मोठे मताधिक्य देण्याचे काम राष्ट्रीय काँग्रेस करणार असल्याचे मत राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे व्यक्त केले आहे.

# राज्यात अजून किती दिवस राहणार अवकाळीचा जोर?


राज्याच्या विविध भागात अवकाळी पावसाचा जोर पाहायला मिळत आहे. एका बाजूला उष्णता आहे, तर दुसऱ्या बाजूला अवकाळी पाऊस कोसळत आहे. दरम्यान, हा अवकाळीचा जोर राज्यात आणखी किती दिवस राहणार याबाबतची माहिती हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली आहे. राज्यातील विविध भागात पुढील आठवडाभर म्हणजे १८ तारखेपर्यंत राज्यात अवकाळी पाऊस पडणार असल्याचे खुळे म्हणाले.

महाराष्ट्रातील (संपूर्ण मराठवाडा, विदर्भ, खान्देश तसेच नाशिक नगर पुणे सातारा सांगली कोल्हापूर सोलापूर ) अश्या २९ जिल्ह्यात आजपासुन पुढील आठवडाभर म्हणजे १८ मे पर्यंत ढगाळ वातावरणासहित तुरळक ठिकाणी भाग बदलत अवकाळी (गडगडाटीसह वीजा, वारा, गारा व धारा सह ) पावसाची शक्यता जाणवते. या पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी योग्य ती खबदारी घ्यावी असं आवाहन करण्यात आलं आहे.

कोणत्या भागात व कोणत्या दिवशी गारपीटीच्या शक्यता?

माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज म्हणजे शनिवार दि.११ ते मंगळवार दि.१४ मे असे चार दिवस संपूर्ण विदर्भ मराठवाडा, खान्देश तसेच नाशिक नगर पुणे सातारा सांगली कोल्हापूर सोलापूर ) अशा २९ जिल्ह्यात मध्यम अवकाळी( गडगडाटीसह वीजा, वारा व गारा) पावसाची शक्यता अधिक जाणवत आहे. रविवार दि. १२ ते मंगळवार दि.१४ मे पर्यंतच्या ३ दिवसात

## कुठं कुठं पडणार पाऊस ?



कोल्हापूर सांगली सोलापूर धाराशिव लातूर नांदेड यवतमाळ गडचिरोली ह्या आठ जिल्ह्यात मध्यम अवकाळी पाऊस व गारपीटीच्या शक्यतेची तीव्रता अधिकच जाणवू शकते.

मुंबईसह कोकणातही अवकाळीची शक्यता वाढली आहे काय?

आजपासून म्हणजे शनिवार दि. ११ ते गुरुवार दि. १६ मे पर्यंतच्या सहा दिवसात मुंबई, उपनगरसह संपूर्ण कोकणातील ठाणे पालघर रायगड रत्नागिरी सिंधुदुर्ग अशा ७ जिल्ह्यातही आता ढगाळ वातावरण राहून अगदीच तूरळक ठिकाणीच किरकोळ पावसाची शक्यता जाणवत आहे.

मुंबईसह कोकणातील कमाल व किमान तापमान ३३ व २५ डिग्री से. राहणार

दरम्यान, माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ मे पर्यंतच्या आठवड्यात मुंबईसह कोकणातील कमाल व किमान तापमान सरासरी इतके म्हणजे ३३ व २५ डिग्री से. ग्रेड तर उर्वरित महाराष्ट्रात ते ४० व २६ डिग्री से. ग्रेड दरम्यान असणार आहे. उष्णतेची लाट, दमटयुक्त उष्णता किंवा रात्रीच्या उकाड्याची शक्यता सध्या महाराष्ट्रात जाणवणार नाही, असे वाटत आहे.

### ऊस दरात प्रचंड तफावत


गुजरात राज्यातील ऊस दर पाहता ते दरात अव्वल ठरले आहेत. तसेच गेल्या १७ वर्षांतील महाराष्ट्र व गुजरातच्या ऊस दरातही प्रचंड तफावत आहे.

अवकाळी पावसाची शक्यता महाराष्ट्रात कश्यामुळे वाढली? : पश्चिम उत्तर प्रदेशातील मध्यभागातील क्षेत्रात समुद्रसपाटीपासून दिड किमीवर उंचीपर्यंत तयार झालेल्या चक्रीय वाऱ्याची स्थिती आहे. तसेच या चक्रीय वारा क्षेत्रापासून दक्षिण आसाममधील हाफलाँग व सिल्चर पर्यंत समुद्र सपाटीपासून ९०० मीटर उंचीपर्यंतच्या पातळीत पूर्व-पश्चिम पसरलेल्या हवेच्या कमी दाबाच्या आस व त्यामुळं दोन्हीही समुद्रातून होणाऱ्या बाष्प पुरवठ्यामुळे पावसाची स्थिती निर्माण झालीय. तसेच मराठवाडा ते कन्याकुमारी पर्यंतच्या वारा खंडितता प्रणाली व त्यातून तयार झालेला ९०० मीटर उंचीपर्यंतचा हवेच्या कमी दाबाच्या आसामुळे पावसाची स्थिती निर्माण झालीय.

मतदानासाठी वातावरणीय दक्षता घेण्याची गरज आहे का ? : महाराष्ट्रातील लोकसभा चौथ्या टप्प्यातील मतदान सोमवारी (१३ मे) रोजी होणार आहे. त्या दिवशी अवकाळी पाऊस व गारपीटीची शक्यता अधिक आहे. त्यामुळं मतदारांनी विशेषतः सकाळ व दुपारच्या प्रहरात म्हणजे दुपारी ३ वाजेपर्यंत मतदान उरकल्यास, त्यांना अवकाळी वातावरणाचा कोणताही विशेष अडथळाही जाणवणार नाही.

# कांदा निर्यात मुल्यावरुन भारत-पाकिस्तानमध्ये चढाओढ

## पाकिस्तानने घेतला मोठा निर्णय



सध्या कांद्याच्या मुद्यावरुन देशातील वातावरण खूपच गरम आहे. एका बाजूला लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देशातील राजकीय वातावरण तापल्याचं पाहायला मिळत आहे. तर दुसऱ्या बाजूला कांदा निर्यात मूल्यावरुन शेतकऱ्यांसह विविध शेतकरी संघटना सरकारवर टीका करताना दिसतायेत. भारताने तब्बल पाच महिन्यानंतर कांदा निर्यातबंद उठण्याचा निर्णय घेतला आहे. भारताच्या या निर्णयानंतर पाकिस्तानने मोठा निर्णय घेतलाय. पाकिस्तानने कांद्यावरील निर्यातमूल्य ७०० डॉलर मेट्रिक टनावरुन ३२५ डॉलर मेट्रिक टन केले आहे.

पाकिस्तानने कांद्यावरील निर्यातमूल्य ७०० डॉलर मेट्रिक टनावरुन ३२५ डॉलर मेट्रिक टन केले मागील वर्षी म्हणजे डिसेंबर २०२३ मध्ये भारतानं कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. ही बंदी ३१ मार्चपर्यंत असल्याचं त्यावेळी सरकारनं सांगितलं देखील होतं. मात्र, मार्च महिन्यात सरकारनं काही बंदी उठवली नाही. सरकारनं ३ मे रोजी कांद्यावरील बंदी उठवली आहे. मात्र, ही बंदी उठवताना सरकारनं काही अटी शर्ती घातल्या आहेत. यामध्ये भारतानं प्रत्येक मेट्रिक टन कांद्यासाठी ५५० डॉलर इतकं किमान कांदा निर्यातमूल्य लावलं आहे. तर ४० टक्के निर्यात शुल्क लावलं आहे. यानंतर पाकिस्तानने मोठा निर्णय घेतला आहे. पाकिस्तानने कांद्यावरील निर्यातमूल्य ७०० डॉलर मेट्रिक टनावरुन ३२५ डॉलर मेट्रिक टन केले आहे.

कांदा निर्यात मूल्यावरून भारत आणि पाकिस्तानमध्ये चांगलीच चढाओढ

दरम्यान, सध्या कांदा निर्यात मूल्यावरून भारत आणि पाकिस्तानमध्ये चांगलीच चढाओढ होणार आहे. पाकिस्तानने हा जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे. त्यांच्या या निर्णयानंतर आता भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये एक प्रकारची स्पर्धा लागली आहे.

देशात कांद्याच्या मुद्यावरुन वातावरण चांगलचं तापलयं : गेल्या अनेक दिवसापासून महाराष्ट्रासह देशात कांद्याच्या मुद्यावरुन वातावरण चांगलचं तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. सरकारने कांदा निर्यातबंदी केल्यामुळं शेतकऱ्यांसह विविध शेतकरी संघटनांनी मोठा विरोध केला होता. या विरोधानंतरही सरकारनं कांदा निर्यातबंदी कायम ठेवली होती. आता मात्र, अनेक शेतकऱ्यांनाकडे कांदा शिल्लक नाही. अशा स्थितीत सरकारनं कांद्याच्या निर्यातीवरील बंदी हटवली आहे. मात्र, ही बंदी हटवताना देखील काही अटी शर्ती लागू केल्या आहेत. त्यामुळं शेतकरी अधीकच आक्रमक झाले आहेत. निर्यातीला परवानगी द्यायची असेल तर कोणत्याही प्रकारच्या अटी न घातला परवानगी द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केलीय.

# राज्यात होणार कापूस बियाण्याची विक्री

## यंदाच्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना १६ मे पासून कापूस होणार बियाणे उपलब्ध

शेतकऱ्यांना बियाणे खरेदीसाठी १५ मे नंतर दुकानं उघडतील. परंतु, बोंडअळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी, १ जून २०२४ नंतरच कपाशीची पेरणी करण्याची शेतकऱ्यांना विनंती करण्यात आली आहे.शेतकऱ्यांना त्रास कमी करण्यासाठी आणि बोंडअळीचा प्रादुर्भाव नियंत्रित करण्यासाठी, १६ मे पासून बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहे.

या निर्णयामागे काही कारणे आहेत: मागील हंगामातील अडचणी: गेल्या काही वर्षांत, बोंडअळीच्या प्रादुर्भावामुळे, कपाशी बियाणे जून मध्येच उपलब्ध होत होते. यामुळे शेतकऱ्यांना खरेदीसाठी गर्दी आणि गैरसोय सहन करावी लागत होती. बोंडअळीचा प्रादुर्भाव नियंत्रित करणे: १ जून नंतर पेरणी केल्याने बोंडअळीच्या जीवनचक्राला अडथळा निर्माण होतो आणि त्यामुळे त्याचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते.



यामुळे काय बदल होईल:

शेतकऱ्यांना वेळेवर आणि सोयीस्करपणे बियाणे खरेदी करता येईल. बोंडअळीचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होईल आणि त्यामुळे उत्पादनात वाढ होईल.

शेतकऱ्यांनी १५ मे नंतरच बियाणे खरेदी करावे.

१ जून नंतरच कपाशीची पेरणी करावी. बोंडअळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी कृषी विभागाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे. ०१७ च्या खरीप हंगामात, शेंदरी बोंडअळीने महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर नुकसान केले होते. २०१८ ते २०२३ पर्यंतच्या उपाययोजनांमुळे बोंडअळीचा प्रादुर्भाव कमी झाला आहे. कापूस शास्त्रज्ञांचा असा सल्ला आहे की, हंगामपूर्व पेरणी टाळणे हे बोंडअळीपासून बचाव करण्यासाठी महत्त्वाचे आहे.

# गारपिटीमुळे यवतमाळ जिल्ह्यात पिकांचे मोठे नुकसान

कृषी विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार, एप्रिल महिन्यातील अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे जवळपास एक हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. यात तीळ, ज्वारी, भाजीपाला, आंबा, पपई आणि केळी यांचा समावेश आहे.गेल्या चार दिवसांपासून जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसा होत आहे. यामुळे खरीप, रब्बी आणि आता उन्हाळी पिकेही या नैसर्गिक आपत्तीचा सामना करत आहेत. ज्वारी, तीळ, गहू, भुईमूग, भाजीपाला, आंबा, पपई, केळी, संत्रा आणि मोसंबी यांसारख्या पिकांना आणि फळबागांना मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या आंब्यांच्या बागा वादळामुळे उद्ध्वस्त झाल्या आहेत.



यापूर्वीच अनेक अडचणींशी झुंज देणाऱ्या शेतकऱ्यांवर या नुकसानीचा आणखी एक ताण आला आहे. खरीप, रब्बी आणि उन्हाळी असे तीनही हंगाम या नैसर्गिक आपत्तीमुळे प्रभावित झाले आहेत. शेतकरी हताश झाले आहेत आणि तातडीने मदत करण्याची मागणी करत आहेत.

तपशीलवार नुकसान: एकूण नुकसान: जवळपास एक हजार हेक्टर, प्रभावित पिके: तीळ, ज्वारी, भाजीपाला, आंबा, पपई, केळी, अतिरिक्त नुकसान: वादळामुळे अनेक आंब्यांच्या बागा उद्ध्वस्त, प्रभावित क्षेत्र: ३९ हजार हेक्टरवर उन्हाळी पिके, नुकसानीचा दिवस: सोमवार २९ एप्रिल (पाचशे हेक्टर)

## जागतिक दिवस:
## जागतिक परिचारिका दिन

### महत्वाच्या घटना

१३६४ : पोलंड देशातील सर्वात जुने विद्यापीठ जगीलीनियन विद्यापीठाची सुरवात झाली.
१४५९ : राठोड कुळातील राजपूत प्रमुख राव जोधा यांनी जोधपूर शहराची स्थापना केली.
१५५१ : अमेरिकेतील सर्वात जुने विद्यापीठ सान मार्कोस राष्ट्रीय विद्यापीठाची सुरवात झाली.
१६६६ : आग्रा येथे औरंगजेबाच्या दरबारात शिवाजीमहाराज व औरंगजेब यांची पहिली व शेवटची भेट झली.
१७९७ : नेपोलिअनने व्हेनिस जिंकले.
१९०९ : पुणे येथे अनाथ विद्यार्थी गृहाची स्थापना
१९१५ : भारतीय क्रांतिकारक रासबिहारी बोस यांनी जपानी नौका सानुकी मारू यातून प्रवास करून भारत देश सोडून जपान येथे आश्रय घेतला.
१९४१ : बर्लिनमधील कोनराड झुझ यांनी जगातील पहिले पूर्णतः स्वयंचलित संगणक ३ सादर केले.
१९५२ : प्रजासत्ताक भारताचे पहिले संसदीय अधिवेशन सुरू.
१९५२ : गजसिंग जोधपुरच्या राजेपदी.
१९५५ : दुसरे महायुद्ध संपल्यावर ऑस्ट्रियाने दोस्त राष्ट्रांकडून स्वातंत्र्य मिळवले.
१९६५ : सोव्हिएट अंतराळ स्थानक लूना ५ चंद्रावर कोसळले.
१९८७ : ब्रिटीश रॉयल नेव्ही मधील एचएमएस हर्मिस हि युद्धनौका विकत घेऊन भारताने तीला आयएनएस विराट या नावाने दाखल केले.
१९९८ : केन्द्र सरकारी कर्मचार्यांचे निवृत्तीचे वय ५८ वर्षांवरुन वरुन ६० वर्षे करण्याचा केन्द्र सरकारचा निर्णय.
१९९८ : भाषातज्ज्ञ आणि वैदिक संस्कृतीचे अभ्यासक रामचंद्र नारायण दांडेकर यांना बिर्ला ॲकॅडमी ऑफ आर्ट अँड कल्चर या संस्थेचा जी. डी. बिर्ला आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर.
२००८ : चीनमध्ये ८.० पेक्षा जास्त तीव्रतेच्या भूकंपात ६९,००० पेक्षा जास्त लोक मारले गेले.
२०१० : एस. एच. कपाडीया यांनी भारताचे ३८ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२० : फ्लोरेंस नाइटिंगेल, आधुनिक शुश्रुषाशास्त्राच्या संस्थापिका; ब्रिटिश परिचारिका.
१८७५ : भारतीय हिंदू धर्माचे गाढे गाढे अभ्यासक व कलकत्ता विद्यापीठाचे तत्त्वज्ञ कृष्णचंद्र भट्टाचार्य यांचे निधन.
१८९५ : भारतीय तत्त्वज्ञ जे. कृष्णमूर्ती यांचा जन्म. (मृत्यू: १७ फेब्रुवारी १९८६)
१८९९ : ईंद्रा देवी, भारतीय योगी.
१९०५ : कृतिशील विचारवंत, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज चे संस्थापक आत्माराम रावजी भट यांचा जन्म. (मृत्यू: १८ जानेवारी १९८३)
१९०७ : चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथालेखक विजयशंकर जग्नेश्वर तथा विजय भट यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑक्टोबर १९९३)
१९०७ : हॉलिवूड अभिनेत्री कॅथरिन हेपबर्न यांचा जन्म. (मृत्यू: २९ जून २००३)
१९२६ : भारतीय जनता पक्षाचे माजी कोषाध्यक्ष व राजकारणी तसचं, पश्चिम बंगाल राज्याचे २२ वे राज्यपाल वीरेंन जे. शाह यांचा जन्मदिन.
१९३० : तारा वनारसे, मराठी-इंग्लिश डॉक्टर, लेखिका.
१९३३ : नंदकुमार महादेव नाटेकर उर्फ नंदू नाटेकर, अग्रगण्य भारतीय बॅडमिंटनपटू.
१९४५ : भारताच्या राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे माजी अध्यक्ष, भारताचे माजी मुख्य न्यायाधीश व सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश कोनाकुप्पाकटील गोपीनाथन बाळकृष्णन यांचा जन्मदिन.
१९५४ : भारतीय राजकारणी आणि तमिळनाडूचे विद्यमान मुख्यमंत्री करुप्पा गौंडर पलानीस्वामी यांचा जन्मदिन.
१९८९ : भारतीय क्रिकेटपटू शिख पांडे यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८०९ : ब्रिटिश भारतीय सैन्य दलाचे वरिष्ठ अधिकारी आणि व्हिक्टोरिया क्रॉसचे प्राप्तकर्ता जनरल सर ह्यू हेनरी गफ यांचे निधन.
१९७० : नोबेल पुरस्कार विजेते जर्मन कवी आणि नाटककार नोली सॅच यांचे निधन. (जन्म: १० डिसेंबर १८९१)
१९९३ : भारतीय हिंदी भाषिक कवी शमशेर बहादूर सिंग यांचे निधन.
२०१० : तारा वनारसे, मराठी-इंग्लिश डॉक्टर, लेखिका.
२०१४ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, आणि पटकथालेखक सरत पुजारी यांचे निधन. (जन्म: ८ ऑगस्ट १९३४)

# घराच्या टेरीसवर महिलेने केली फळे फुले आणि भाज्यांची लागवड

अलीकडच्या काळात अनेक लोक शेतीत नवनवीन प्रयोग करताना दिसत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून यशस्वी शेती करत आहेत. यातून भरघोस उत्पादन देखील मिळवतायेत. शेती क्षेत्रात महिलांच्या बरोबरीनं स्त्रिया देखील राबताना दिसत आहेत. आज आपण अशाच एका महिलेची यशोगाथा पाहणार आहोत. ज्या महिलेनं आपल्या घराच्या टेरीसवर ३०० हून अधिक भाज्या पिकवल्या आहेत. रितू गोयल असं आग्रा जिल्ह्यातील बलकेश्वर येथील इंद्र एन्क्लेव्ह येथे राहणाऱ्या या महिलेचं नाव आहे.

रितू गोयल यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांना लहानपणापासून बागकामाची आवड होती. दरम्यान, २०२१ मध्ये कोरोना संकटाच्या काळात त्यांनी गच्चीवर छोट्या कुंड्यांमध्ये रोपे लावली होती. त्यानंतर त्यांनी घराच्या गच्चीवर विविध प्रकारच्या भाज्या लावण्याचा निर्णय घेतला. आज त्यांच्याकडे ३०० हून अधिक प्रकारच्या भाज्या सेंद्रिय पद्धतीनं पिकवल्या जात आहेत. यामुळं रितू गोयल यांची सर्वत्र चर्चा होत आहे.

झाडांमुळे घराचे तापमानही खूप कमी राहते

कोरोनाच्या काळात थोड्या प्रमाणातच कुंड्या होत्या. त्यामध्ये भाज्यांची लागवड केली होती. मात्र, हळूहळू भाज्यांचे प्रमाण वाढत गेले. यानंतर टेरीसचे रुपांतर बागेत झाल्याची माहिती रितू गोयल यांनी दिली. टेरीसवर लावलेल्याभाज्यांमध्ये वांगी, हिरवी मिरची, कोबी, फ्लॉवर, पालक, धणे, पुदिना, मिरची आदी भाज्या पिकवल्या जात आहेत. भाजीपाल्याशिवाय फुलांची छोटी झाडे आणि अनेक वनौषधीही लावल्या आहेत. रितू स्वतः या रोपांची काळजी घेतात. तसेच कुटुंबातील इतर सदस्यांचेही सहकार्य आहे. आता त्याचे घर पूर्णपणे झाडांनी भरले आहे आणि हिरवेगार दिसत आहे. या झाडांमुळे घराचे तापमानही खूप कमी राहत असल्याची माहिती त्यांनी दिली.


विविध फळांचीही लागवड : दरम्यान, रितू गोयल यांनी दिलेल्या माहितीनुसार, पेरू, चेरी, संत्रा, लिंबू, आंबा, ब्लॅकबेरी, डाळिंब, काकडी, काकडी, वांगी, टोमॅटो, भेंडी, कढीपत्ता, पालक, पुदिना, क्रॅनबेरी, हळद, दालचिनी, बडीशेप, तुळस, मारवा तुळस या वनस्पतींची देखील रितू गोयल यांनी लागवड केलीय. फुलांमध्ये अपराजिता, हरसिंगार, सदाहरित, झेंडू, चमेली, चंपा, कणेर, रात राणी, पिटुनिया, ८ जातींचे गुलाब, हिबिस्कस, मोगरा, एस्टर, बोगनविले, मधुमालती, गणेश वेल अशा विविध प्रकारच्या फुलांची देखील लागवड केलीय.


व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून इतरांनाही मार्गदर्शन : या भाजीपाला लागवडीच्या संदर्भात रितू गोयल यांनी एक व्हॉट्सॲप ग्रुपही तयार केलाय. यावर त्या वनस्पतींची काळजी कशी घ्यायची यासंदर्भातील माहिती देत असतात. मुंबई, जयपूर, लखनौ, भोपाळ, दिल्ली, गुडगाव ते लंडन अशी विविध ठिकीणचे सदस्य त्यांच्या या ग्रुपवर जोडले गेले आहेत.

पर्यावरण संतुलनासाठी रितू गोयल प्रयत्नशील : रितू गोयल या निसर्ग संवर्धन आणि पर्यावरण संतुलनासाठी देखील काम करतात. तसेच शाळा, उद्याने, झाडे लावणे यामध्येही त्या काम करतात. दर महिन्याला त्या रोपांचे वाटप देखील करतात



# टपाली मतदान केंद्राला निवडणूक निरीक्षकांनी दिली भेट







बीड । प्रतिनिधी

अपर जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या परिसरात सुविधा केंद्राच्या माध्यमातून टपाली मतदान सुरू असून या केंद्राला निवडणूक निरीक्षक अजीमुल हक यांनी आज भेट दिली.

बीड लोकसभा मतदारसंघातील टपाली मतदान सुरू असून तहसील कार्यालय तसेच अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात सुविधा केंद्राच्या माध्यमातून टपाली मतदान केल्या जात आहे. या टपाली सुविधा मतदान केंद्राला आज निवडणूक निरीक्षक अजीमुल हक यांनी भेट दिली. यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, सहाय्यक उपजिल्हाधिकारी तथा टपाली मतदान नोडल अधिकारी शैलेश सूर्यवंशी यावेळी उपस्थित होते.

### मतदान केंद्रावर असणार पाळणाघर-विश्रांती कक्ष

बीड शहरातील चंपावती विद्यालय बीड या मतदान केंद्राच्या ठिकाणी महिला मतदारासाठी पाळणाघर, विश्रांती कक्षाचीची पाहणी जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे, एम.एफ. कक्षाच्या प्रमुख तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगितादेवी पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. चंद्रशेखर केकाण यांनी पाहणी केली. बीड शहरातील पश्चिम कार्यालयाच्यावतीने बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) बीड पश्चिम कार्यालयाच्या वतीने प्रकल्पांतर्गत बीड शहर-११, गेवराई शहर-३, आष्टी-२, पाटोदा-१० व शिरुर शहर-२ असे एकूण २८ महिला मतदारासाठी पाळणाघर, विश्रांती कक्ष स्थापन करण्यात आलेले आहे.

### केंद्राध्यक्ष व अन्य सहाय्यकांची सरमिसळ

बीड लोकसभा मतदारसंघातील २३५५ मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष व अन्य सहायकांची आज सरमिसळ पद्धतीने निवड करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नॅशनल इन्फॉर्मेशन सेंटरच्या कार्यालयात निवडणूक निरीक्षक अजीमुल हक, जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे, यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच राजकीय पक्षाच्या समक्ष ही सरमिसळ प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. बीड लोकसभा मतदारसंघातील एकूण २३५५ मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष व त्यांचे तीन सहकारी आणि राखीव अधिकारी कर्मचाऱ्यांची अशा एकूण १०,४३२ नावांची सरमिसळ प्रक्रियेद्वारे आज निवड झालेली आहे. निवड झालेल्या मतदान केंद्र अध्यक्ष तथा सहकाऱ्यांना उद्या रविवार दिनांक १२ मे रोजी सहा विधानसभा मतदार संघातील निश्चित मतदान केंद्र सांभाळण्यासाठी त्यांना निघणे आहे.

यानंतर त्यांनी अपर जिल्हाधिकारी यांच्या कक्षात स्ट्राँग रूम संदर्भातील कामांची आणि तेथील सुरक्षितेबाबतची चर्चा केली. यासह १३ मे रोजी होणाऱ्या निवडणुकीच्या काळात विधानसभा निहाय केलेले सुव्यवस्था बद्दलही चर्चा झाली.

निवडणूक निरीक्षक अजीमुल हक यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात सूक्ष्म निरीक्षकांची बैठक घेतली. यावेळी श्री हक, जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे उपस्थित होते. निवडणुकीच्या दिवशी नियुक्त सूक्ष्म निरीक्षकांनी थेट निवडणूक निरीक्षकांना अहवाल सादर करणे आहे. हे सुक्ष्म निरीक्षक लोकसभा बीड मतदार संघातील सहा विधानसभा मतदारसंघात नियुक्त असून ते सेक्टर अधिकारी यांच्याकडून अहवाल घेऊन निवडणूक निरीक्षकास सादर करतील. कोणत्याही विधानसभा मतदार संघ क्षेत्रात काही अनुचित प्रकार घडत असल्यास तातडीने माहिती देण्याचे काम हे निवडणूक निरीक्षक करतील. आज त्यांना याबाबत सूचना आणि मार्गदर्शन देण्यात आलेले आहे.

## नरदेहात येऊन आपल्या जीवनाची सार्थकता करून घ्यावी-पांडुरंग महाराज



मृत्यूलोकी मनुष्यास भगवंताने मनुष्य देह दिलेला असून भगवंत प्राप्ती करून घेतल्यास जीवन सार्थ घे लागणार आहे .म्हणूनच नरदेहात येऊन आपल्या जीवनाची सार्थकता करून घ्यावी असे प्रतिपादन हरिभक्ति परायण महंत पांडुरंग महाराज श्रीक्षेत्र संस्थान करंजवणकर यांनी भाऊ बाबा प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे कीर्तन प्रसंगी केले.

बीड येथील इंद्रप्रस्थ कॉलनी येथे संत भगवान बाबा, वामनभाऊ महाराज, संत तुकाराम महाराज, विठ्ठल रुक्मिणी व हनुमान देवतामूर्ती प्राण प्रतिष्ठापनेच्या तपपुर्ती सोहळा व १२ व्या वर्धापन दिनानिमित्त त्रिदिवशीय कीर्तन महोत्सवात प्रारंभिक किर्तनप्रसंगी रामकृष्ण नामी दोन्ही साजिरे / हृदय मंदिरी स्मरा कारे // १ // या संत ज्ञानेश्वरमाऊली यांच्या तीन चरणी अभंगतून ह.भ.प. पांडुरंग महाराज हे जन्म मरणाच्या बंधनातून सोडवणूक करण्याचे साधन सांगतात.

आपल्या अभंग निरूपणातून बोलतांना पांडुरंग महाराज म्हणाले की बीड जिल्ह्याच्या भूमीत अनेक सत्पुरुषांची चरण कमले लागून ही भूमी परमपावन झालेली आहे. देवांनी या जगतात अनेक व्यक्ती, पदार्थ, वस्तुस जन्माला घातले आहे. परमार्थात अनेक शब्द ,अभंगातील शब्द आले आहेत. हे वेदाचे शब्द आहेत. राम शब्दापासून राममंत्र झाला. जुळणी जुळली अक्षरेही मंत्र होतात. प्रत्येक व्यक्ती काहीतरी योग्यतेचा असतो. राम नाम या मंत्राचा उच्चार केल्यास माणसाचे जे दोष असतात ते जळून जातात. भगवंतांनी हा देह आपणास आपले कल्याण करून घेण्याकरिता दिलेला आहे.

पण या ठिकाणी माणसं सत्ता, विषय, संपत्तीसाठी खर्च करतात. भगवंताकडे आपणास जाण्यासाठी विचाराचा वापर करून नामस्मरण करावे लागेल त्यामुळे आपले सर्व दोष जळून जातील. त्यातून आपणास उत्तम सार उत्तम गती मिळेल. तुका म्हणे जन्मा आल्याचे सार्थक /विठ्ठलाची एक देखलिया/ आपणास संसाररूपी बंधनातून सुटण्यासाठी हृदयात रामकृष्ण नाम धारण करावे लागेल. आचरण बिघडले तर त्याचा परिणामही बिघडतो.

म्हणून विचार करूनच आचरण करावे म्हणजे योग्य ते जीवन बनेल. आपण मुक्त होतो पण बद्ध झालो .संसारास धरले म्हणून आपले पतन झाले यातून बाहेर येण्यासाठी कलयुगी उद्धार हरीच्या नामे / याने जीवन सार्थकी लागते . असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी ह भ प मोहन महाराज खरमाटे, रामहरी महाराज रसाळ गुरुजी, अनंत घीगे साहेब पत्रकार रिपोर्टर, नारायण नागरे महाराज., राजेंद्रजी सानप, पंचाळ गुरुजी, एपी नागरगोजे ,राजेंद्र घोलप, अश्रुबा नागरगोजे ,ज्ञानदेव आगलावे, प्रवीण सानप, धनंजय राजेंद्र सानप. गायक म्हणून ह भ प वैजनाथ सानप गुरुजी, दिगंबर कुंडलकर महाराज, अरुण बावणे महाराज, राजगुरू महाराज ,किसन माने महाराज, हर्ष धांडे महाराज ,वैभव वेडे महाराज. मृदंगमणी म्हणून अक्षय घोलप महाराज तळेगाव तर असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.

## कासारी येथे बैलगाडा शर्यतीचा थरार;मंठ्या च्या बैलजोडीने मैदान मारले

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील कासारी येथे युवानेते भागवत दराडे यांच्या वाढदिवसानिमित्त विभागीय बैलगाडा शर्यत पार पडली. हजारो शौकिनांच्या उपस्थितीत जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील वाटुर फाटा येथील शेतकरी कैलास राठोड यांच्या बैलजोडीने रोमांचकारी विजय मिळवत उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. ५१ हजार रुपये रोख बक्षीस देत बैलगाडा मालकाचा सन्मान करण्यात आला.कासारी येथे मागील दोन वर्षांपासून जैतापूर सरपंच भागवत दराडे यांच्या वाढदिवस निमित्ताने बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात येते. गुरुवारी आयोजित बैलगाडा शर्यतीचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद सभापती जयसिंह सोळंके व सरपंच भागवत दराडे, दौलत बडे यांच्या हस्ते करण्यात आले.यावर्षी छत्रपती संभाजी नगर विभागातील आठ जिल्ह्यातील १२५ बैलगाडा मालकांनी या शर्यतीत सहभाग नोंदवला. आठ राऊंड मध्ये प्रथम व द्वितीय येणाऱ्या बैलगाड्यांची उपांत्य फेरी घेण्यात आली. चार उपांत्य फेरीत विजय



मिळवणाऱ्या आठ बैलजोड्यांचा अंतिम सामना खेळविण्यात आला. डोक्यावर प्रचंड उन तळपत असताना सुद्धा हजारो प्रेक्षकांनी मैदानाच्या दुतर्फा गर्दी केली होती. कोणत्याही बैलगाडा मालकावर अन्याय होऊ नये म्हणून संयोजकांनी अचूक निर्णय व्हावा यासाठी खास पंचांची व्यवस्था केली होती.

यावेळी वाटूर फाट्याच्या बैलजोडीने रोमांचकारी विजय मिळवला. गजानन होंडे,होंडेगाव बैलगाडा द्वितीय, रामगिरी बाबा प्रसन्न, हदगाव तृतीय, आई येडेश्वरी प्रसन्न,डोका हदगाव चौथा, आबा गोंडे,सिरसगाव पाचवा,महारूद्र प्रसन्न नखाते हदगाव सहावा, गोविंद बालासाहेब डाके, बाभळगाव सातवा व आई तुळजाभवानी देवनांद्रा यांनी आठव्या क्रमांकावर राहत विजय मिळवला. विजयी बैलगाडा मालकांना जयसिंह सोळंके, भारत नागरगोजे, श्यामसुंदर बडे, दौलतराव बडे, बळीराम गवते, प्रशांत उघडे, प्रशांत बडे आदी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. सर्व रोमांचकारी सामन्यांमध्ये उपस्थित मंत्रमुग्ध झाले होते.विजयी बैलगाडा मालकांनी मैदानावर गुलाल उधळत आनंदोत्सव साजरा केला. कासारी ग्रामस्थांनी स्पर्धेचे चोख नियोजन केले होते. ड्रोनद्वारे सर्व सामन्यांची चित्रफित अचूक निकाल देण्यात आला. बैलगाडा शर्यत यशस्वी करण्यासाठी राजेभाऊ बडे समाधान बडे पै अंकुश बडे इंद्रजीत बडे संभाजी केंद्रे किरण बडे बाळासाहेब विठ्ठल बडे बाजीराव उघडे रेवल बडे दादासाहेब बडे बप्पा बडे अमीर शेख बिबीशन बडे गणेश बडे सह गावातील सर्व तरुण कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. झेंड पंच म्हणून बालासाहेब बडे फौजी फिरू आबूज ऋषी बडे यांनी काम केले.

## रेवण गायकवाड यांनी वृद्धाश्रमात केला वाढदिवस साजरा



केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील पिंपळगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा युवा उद्योजक रेवण गायकवाड यांनी आपला वाढदिवस दि. १० मे रोजी अत्यंत साध्या पद्धतीने व कुठलाही वाह्यात खर्च न करता कळसंबर येथील वृद्धाश्रमातील वृद्धांना फळवाटप व पाली येथील अनाथ मुलांना फळवाटप व आर्थिक मदत करून साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी वृद्ध व अनाथ मुलांच्या सोबत केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला.

केज तालुक्यातील पिंपळगाव येथील रेवण गायकवाड हे कायम सामाजिक कार्यात आग्रेसर असतात. ते दरवर्षी आपल्या वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्य करत आहेत. आपण कोणाचे तरी काही तरी देणे लागतो हा विचार त्यांच्या मनात कायम घर करून आहे.

दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी कळसंबर यंथील वृद्धाश्रमात वृद्धांना व पाली येथील अनाथ अश्रमात आर्थिक मदत करून वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

## चौसाळा बस स्थानकाच्या बांधकामाला स्थगिती द्या : मागणी

चौसाळा । प्रतिनिधी

येथील नव्याने होणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या चौसाळा बस स्थानकाला नव्याने बांधकाम व नूतनीकरण कामाला नुकतीच मंजुरी मिळाली असून सदर बस स्थानकाचे काम लवकरच सुरू होणार आहे सदर हे बांधकाम केवळ गुत्तेदाराच्या फायद्याने व त्याच्या मर्जीतून सुरू सुरू केले जात आहे सदर काम थातूरमातूर पद्धतीने केले जाणार आहे तरी सदर बांधकामाला महाराष्ट्र राज्य परिमंडळाने परवानगी न देऊन या कामाला स्थगिती द्यावी अशी मागणी चौसाळा ग्रामस्थांच्या वतीने परिवहन मंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे.

चौसाळा बस स्थानकाचे नव्याने बांधकाम व नूतनीकरण करण्यासाठी शासनाकडून जवळपास पावणेतीन कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे



असल्याचे कळते दरम्यान सदर बांधकाम करणारे समंधित गुतेदार हे थातूर मातुर पद्धतीने काम करण्याचा त्यांचा घाट आहे चौसाळा बस स्थानकात प्रवाष्याच्या वाढत्या संखे नुसार जागा अपुरी आहे तर सदर बस स्थानकामधील कॅन्टींग च्या अपुऱ्या जागेतच थाटणार आहेत तर स्वच्छता ग्रहाचे नव्याने बांधकाम न करता केवळ रंग रंगोटी करूनच गुत्तेदाराचा बिल उचलण्याचा घाट आहे तरी अधिकाऱ्याने या बांधकामाला तातडीने स्थगिती देऊन व नव्याने बांधकामचा आराखडा काढून चौसाळा बस स्थानकाचे योग्य पद्धतीने बांधकाम करावे अशी पद्धतीने अशी मागणी चौसाळ्याचे जेष्ठ कार्यकर्ते तथा बाबुशेठ लोढा यांच्यासह उपसरपंच अंकुशराव कळासे मोहनराव झोडगे विकास नाईकवाडे पत्रकार एनटी वाघमारे विकास सर्वज्ञ यांच्या सह इतर मान्यवराने एका निवेदनाद्वारे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन यांच्यासह माननीय जिल्हाधिकारी माननीय तहसीलदार यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

## परशुराम जन्मोत्सव समितीच्यावतीने डोळ्यांचे पारणे फेडणारी शोभायात्रा संपन्न: हजारोंचा सहभाग

बीड । प्रतिनिधी

भगवान परशुराम यांचा जन्मोत्सव वैशाख शु.३ शुक्रवार दि.१० में २०२४ रोजी बीड शहरातील भगवान परशुराम जन्मोत्सव समिती बीडच्या वतीने धोंडीपुरा भागात भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले नंतर सुशोभित रथातून, बँड पथकांच्या देशभक्तीपर मधूर ध्वनींच्या तालावर आणी जय परशुराम, जय परशुरामांच्या, भारतमाता की जय छत्रपती शिवाजी महाराज की जयच्या गजरात तसेच अश्वावर आरुढ झालेले भगवान परशुरामांच्या रुपातील देवा कुलकर्णी, सुंदरपण आकर्षक विद्युत रोषणाई, भगवे ध्वजधारी, फुलांची उधळण, फटाक्यांची आतिषबाजी, नवयुवक, युवती, महिला, पुरुष भाविकभक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

ठिकठिकाणी स्वागत स्विकारीत ही शोभायात्रा धोंडीपुरा, माळीवेस, सुभाष रोड, डीपी.रोड मार्गे सहयोगनगर भागातील सर्वेश्वर गणपती मंदिर येथे विसर्जित झाली. या शोभायात्रेत नगरसेवक जगदीश गुरखुदे, संपादक दिलीप खिस्ती, डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हांकर, बाळासाहेब अंबेकर, डॉ.रमाकांत निर्मळ, महेश




वाघमारे, सुधाकर कुलकर्णी, हेमंत गोंदीकर महाराज, प्रशांत सुलाखे, चंद्रकांत जोशी, परशुराम गुरखुदे, अभिजीत बरीदे, सचिन कुलकर्णी, दादाराव देशपांडे, संतोष जवकर, योगेश कुलकर्णी, वैभव वैद्य, अजिंक्य पांडव, बाळासाहेब थिगळे, बाबा पाठक, संजय कुलकर्णी, परशुराम जन्मोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष अक्षय कुलकर्णी (भालेराव), समितीचे अध्यक्ष अध्यक्ष शुभम कायदे, उपाध्यक्ष अक्षय देशपांडे, सचिव राहुल देशमुख, आकाश जवकर, रोहित कुलकर्णी, जगदीश अनेराव, रेणूकादास व्यास, संदीप पालसिंगणकर, अमोल कुलकर्णी, गुरू कुलकर्णी, रामू दीक्षित, विशाल जोशी, विशाल कुलकर्णी, निखिल सुलाखे, विकास शाईवाले, ओंकार पाठक, महेश देशमुख, लक्ष्मीकांत देशमुख देवा, प्रतीक रामदासी, ऋषिकेश कवाहळे, माहेश्वरी प्रगती मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर जेथलिया, सचिव बद्रीनाथ मानधने, सि.ए.गोपाल कासट, डॉ.राजेद्र सारडा, सुरज लाहोटी, ॅड.समीर पाटोदकर, ॅड.जे.डी.पांडव, मुकुंद पाटील, अविनाश कुलकर्णी, दिपक,सर्वज्ञ, सौ.मंगलताई आगवान, सौ.संगिता धसे, विविध क्षेत्रातील मान्यवर महिला पदाधिकारी, परशुराम जन्मोत्सव समिती बीडचे सदस्य, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, परशुराम सेवा संघ, पेशवा युवा मंच, कन्वं परिषद बीडचे पदाधिकारी, सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, मान्यवरांचा या शोभायात्रेत सहभाग लाभला. शोभायात्रा सर्वेश्वर गणपती मंदिर येथे आल्यानंतर भगवान गणेशजी, भगवान परशुराम यांची महाआरती करण्यात आली. जनहितार्थ संदेश- उद्या सोमवार दि.१३ मे रोजी सकाळी ७.०० ते सांय.६.०० यावेळेत बीड जिल्ह्यातील तमाम युवक, युवती, महिला, पुरुष,जेष्ठ मंडळीसह मित्रपरिवार स्नेहीजन मतदारांनी उन्हाळ्याची दाहकता, तहान, भूक, सर्व कामे बाजूला ठेवून भारतीय लोकशाही बळकट करण्यासाठी आणी भारताच्या उज्वल भवितव्यासाठी मोठ्या संख्येने मतदान करण्याचे समितीच्या वतीने विनम्र आवाहन करण्यात आले आहे.

## लोरी हिंदी चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील छोट्याशा ग्रामीण भागातून पुणे सारख्या मोठ्या शहरात जाऊन चित्रपट दिग्दर्शनाचे बारकावे शिकून दिग्दर्शनासह कथा, पटकथा व गीत लेखन करत चंदेरी दुनियेत आपली वेगळी ओळख निर्माण करणारे बीड जिल्ह्याचे जावई अल्ताफ दादासाहेब शेख यांनी लोरी या हिंदी चित्रपटापासून संगीत दिग्दर्शनाच्या क्षेत्रातही पदार्पण केले. त्यांच्या मेहनतीचे येथेही सोने झाले असून त्यांनी प्रथमच संगीत दिलेला लोरी हा हिंदी चित्रपट संपूर्ण देशभरासह बीड शहरातील संतोषीमाता चित्रमंदिर व आशा टॉकीज येथेही प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाला व याच्या गीत संगीतालाही प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून चित्रपट चांगली गर्दी खेचत आहे.

अल्ताफ शेख यांनी पदार्पणातच सुमधूर संगीत दिल्याने अभिनेत्री जागृती जाधव आणि खोपोली महानगरपालिकेचे अधिकारी जाधव यांनी अल्ताफ शेख यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. लोरी महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात आपल्या जवळच्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला



प्रतिसाद मिळत असून बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने पाच दिवसांत साडेचार कोटींचा गल्ला जमा केला आहे. माऊथ पब्लिसिटीमुळे चित्रपट दुसऱ्या आठवड्यात सिनेमागृहात अजून जास्त गर्दी खेचेल असा अंदाज आहे. चित्रपटातील उर्मिला धनगरी यांनी गायलेल्या हुक्का बड़ा नशीला आणि सुप्रसिद्ध अनुभवी पार्श्वगायक सुरेश वाडकर यांनी गायिलेले ममता की मुरत ही गाणी प्रेक्षकांच्या चांगल्याच पसंतीस उतरली आहेत. याच्या संगीत दिग्दर्शनासह गीते ही अल्ताफ शेख यांनीच लिहिली आहेत. चित्रपटाची निर्मिती अविनाश कवठणकर आणि राजू रेवणकर यांनी साईराम अ क्रिएटिव्ह वर्ल्ड या बॅनर खाली केली असून चित्रपटाची कथा, पटकथा, गीत, संगीत आणि कलाकारांनी केलेला उत्तम अभिनय प्रेक्षकांना खिळवून ठेवत आहे.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

महासंग्राम

रविवार दि.१२ मे २०२४ | ६

# कर्तृत्वान लेकीच्या विक्रमी विजयावर परळीतील अभुतपूर्व सभेने केलं शिक्कामोर्तब!

## तुमचं प्रेम आहेच– लोकसभेला संधी द्या: जीवाचे रान करुन विकासरुपाने परतफेड करेन – पंकजाताई मुंडे

परळी वैजनाथ,।दिनांक ११।

बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी लोकसभा निवडणुकीत मतदानरूपी आशीर्वाद देऊन आपले नेतृत्व करण्याची संधी मला आपण सर्वांनी द्यावी. यापूर्वी राज्यात मंत्रिमंडळात काम करत असताना जिल्ह्यातील गाव,वाडी, वस्ती तांड्यापर्यंत विकासाची गंगा आपल्याला आणता आली. तुमचे आशीर्वाद माझे नेतृत्व घडवत आहे. मी विकास केला आहे हे जनता मान्य करते. ही निवडणूक विकासासाठी आहे, राज्याला आणि जिल्ह्याला एकच सरकार हवे आहे.. देशासाठी काम करायची संधी आहे.माझ्यावर तुमचं प्रेम आहेच. यावेळी लोकसभेला संधी द्या.जीवाचे रान करुन विकासरुपाने त्या प्रेमाची नक्कीच परतफेड करेन असा विश्वास पंकजाताई मुंडे यांनी दिला.





बीड लोकसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचाराची समारोप सभा परळीच्या मोंढा मैदानावर झाली.या अभुतपूर्व विराट जाहीर सभेला छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज छत्रपती उदयनराजे भोसले, कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे, रासपचे अध्यक्ष महादेव जानकर, माजी मंत्री संभाजी पाटील, किरण पाटील आदींसह मान्यवर उपस्थित होते. यावेळी तमाम परळिकरांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज छत्रपती उदयनराजे भोसले यांचा ह्रदय सत्कार करण्यात आला.यावेळी बोलतांना पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, जो वंचित, उपेक्षित आहे, ज्याचा कोणी वाली नाही त्याची सेवा करण्यासाठी माझ्या पित्याने मला राजकारणात आणलं. मला पाच वर्षे मुंडे साहेबांनी मागितले होते मात्र त्यापुर्वीच त्यांचे निधन झाले.आता तुम्हीच वैद्यनाथाची सावली म्हणून माझे आहात. तुम्हीच माझी उर्जा आहात.तुम्हीच माझी या निवडणुकीत काळजी घ्या. तुमच्या सेवेसाठी मी काम करणार आहे हा विश्वास पंकजाताई मुंडे यांनी दिला.

जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करायचा आहे

मला जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करायचा आहे. जिल्ह्यातील जमीन ओलिताखाली आणायची आहे. शेतकरी ऊस तोड कामगारांचे जोवन उंचावण्यासाठी काम करायचं आहे, मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली मला हे काम आगामी पाच वर्षात करायचे आहे. जिल्ह्यातील १० हजार तरुणांना जिल्ह्यात रोजगार उपलब्ध करून घ्यायचा आहे. जिल्ह्यात कॅन्सर रुग्णालय उभारायचे आहे. यासाठी ही निवडणूक असुन प्रचंड मताधिक्याची मला अपेक्षा आहे असे पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

### माझ्यावर वैद्यनाथाची सावली म्हणून उभे राहून तुम्हीच आशीर्वाद द्या !

### जिल्ह्यातील विकासाचं जे केलय ते आम्हीच केलं आणि जे नाही झालं ते आम्हीच करणार आहोत

### आजचा परळीतील मंच अस्वस्थता दूर करून शांती व समाधान देणारा

आजचा मंच अस्वस्थता दूर करून शांती व समाधान देणारा

आजचा परळीतील मंच अस्वस्थता दूर करून शांती व समाधान देणारा आहे.पहिल्यांदा जेंव्हा मी निवडणूक लढली त्यावेळी स्व. गोपीनाथराव मुंडे, स्व. पंडितअण्णा मुंडे ,धनंजय मुंडे असा संपूर्ण परिवार या मंचावर होता.त्यानंतर जे घडले ते माझ्यासाठी अस्वस्थ करणारे होते.मी निवडणूक जिंकले,मंत्री झाले, अनेक कामे केली,राजकीय वाटचाल सुरु राहिली.धनंजय मुंडेही विरोधीपक्षनेते झाले,मंत्री झाले त्यांचीही राजकीय वाटचाल सुरु राहिली मात्र मनातील अस्वस्थता कमी झाली नाही.आज आम्ही एक आहोत.आमच्या पक्षांचीही युती झाली. त्यामुळे आजचा परळीतील मंच अस्वस्थता दूर करून शांती व समाधान देणारा असल्याचे पंकजाताई यांनी यावेळी सांगितले.

# पंकजाताई मुंडे यांना प्रचंड बहुमतांनी विजयी करा –माजी आ.केशव आंधळे

**वडवणी । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील थेटेगव्हण,पहाडी पारगांव,पहाडी दहीफळ या डोंगर पट्ट्यातील गावामध्ये अक्षय तृतीयाच्या शुभमुहूर्तावर शुक्रवार दि.१० मे २०२४ रोजी बीड लोकसभा मतदारसंघाच्या भारतीय जनतापार्टी व महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ चौसाळा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या दौऱ्याला मतदारांचा उदंड प्रतिसाद.



**पंकजाताई यांच्या प्रचारार्थ धारूर,वडवणी तालुक्यामध्ये केशवदादांचा झंजावती प्रचार दौरा संपन्न**

या बाबत सविस्तर वृत्तांत असा की,माजलगाव विधानसभा मतदारसंघातील धारूर,वडवणी तालुक्यातील डोंगरपट्ट्यातील गावांमध्ये माजी आमदार केशवराव आंधळे यांनी बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ नियोजित दौरा केला त्यादरम्यान ते म्हणाले की,पंकजाताई बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना पंकजाताईंनी राष्ट्रीय महामार्गासह, राज्यमार्ग, शासनाच्या वेगवेगळ्या योजना व पिकविमासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी त्यांनी मंजूर करून आणला,बीड जिल्ह्याच्या विकासाच व्हिजन असणाऱ्या नेत्या आहेत,सर्व जाती धर्माचे हीत पाहणाऱ्या आहेत, शेतकऱ्यांचे, ऊसतोड मजुरांचे, सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्याचं काम त्या करतील पंकजाताई फक्त खासदार नाही तर त्या मंत्री होणार आहेत बीड जिल्ह्याच्या विकासासाठी येणाऱ्या १३ तारखेला मतदान केंद्रावर जाऊन अनुक्रमांक एक असलेल्या पंकजा गोपीनाथराव मुंडे यांच्या कमळ चिन्हासमोरील बटन दाबून पंकजाताईला प्रचंड बहुमताने विजयी करून दिल्लीला पाठवा असे त्यांनी मतदारांना आवाहन केले.

थेटेगव्हाण,पहाडी पारगाव,पहाडी दहिफळ या गावातील दौऱ्या दरम्यान माजी आमदार केशवराव आंधळे यांच्यासोबत वडवणी नगरपंचायतचे ◀◀ पान २ वर

# लोकशाही टिकवण्यासाठी आणि बीडचा विकास करण्यासाठी बजरंग सोनवणे यांना विजयी करा-प्रदिप थोरवे

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ लोणी गटात आज प्रदिप थोरवे (आप युवक संघटन मंत्री महाराष्ट्र राज्य),ऋषीकेश दरेकर (युवक ता.अ.रा.कॉ.)महादेव साके,(जिल्हा ऊपाध्यक्ष रा कॉ) संदिप हांडे( ता.अ.शिवसेना) यांनी गावभेट दौंरा केला, यावेळी प्रदिप थोरवे बोलत होते. या बीड जिल्ह्याचा विकास फक्त मुंडे कुटुंबामुळेच खुंटलेला आहे, गेली १० वर्ष पालकमंत्री आणि खासदारकी मुंडे कुटुंबात असताना बीडचा विकास का केला नाही ? विमानतळ नाही,शासकीय मेडिकल कॉलेज नाही, सुतगीरणी नाही, मग निवडुन येवुन काय



करता ? असे प्रश्न प्रदिप थोरवे यांनी बोलताना विचारले.

२०२० चा पिकविमा नाही, २०२३ चा पिकविमा दिवाळीच्या आधी देनार नाहीतर दिवाळी साजरी करनार नाही, असे पालकमंत्र्यनी सांगीतले परंतु दुसरी दिवळी आली पन पिकविमा भेटला नाही, अशा प्रकारची खोटी आश्वासने देनार्या पार्टी चा ऊमेदवार जनता निवडुन देनार नाही. निवडनुका आल्या की जातीपातीचे राजकारण करणाऱ्यांना धडा शिकवन्याची ही निवडनुक आहे. ही निवडनुक जातीपातीवर न होता विकासावर होयला पाहीजे,ज्या गावात खासदार ताईंच काम नाही,निधी नाही त्या गावातून बजरंग बप्पांना १००% मतदान होयला पाहीजे.ही निवडनुक पंकजा ताई विरुद्ध बजरंग बप्पा नसुन लोकशाही विरुद्ध हुकुमशाही अशी ही निवडनुक आहे. मोदि पुन्हा सत्तेत आले तर या देशात पुन्हा निवडनुक होनार नाही अशी भीती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही,महागाई वाढत चालली आहे, खतांचे भाव गगनाला भीडलेत, विरोधी पक्षांना बोलन्याचे स्वातंत्र्य राहीलेले नाही. सरकाच्या विरोधात बोलनार्यांना जेल आणी भ्रष्टाचारी लोकांना मंत्रीपद अशाप्रकारची मोदि सरकारची भुमीका असुन लोकांना ती पटवणारी नाही. म्हनुन बजरंग ◀◀ पान २ वर

# जरांगे पाटलांच्या मागण्या सभागृहात मांडणार –बजरंग बप्पा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दिल्लीला ही झुकावे लागले येवढ्या मोठ्या ऊचीचे मराठा आंदोलन माननीय मनोज जरांगे पाटील यांनी मराठवाड्यातुन ऊभा केले त्याचा आदर करून समाजाच्या मागण्या मान्य करणे अपेक्षित असताना शासनाने मराठा समाज सह धनगर व मुस्लिम समाज याना फसवले आहे  मि निवडून आल्यानंतर जरांगे पाटलांच्या मागण्या जशास तशा  दिलीत सभागृहात लावून धरणे असे आश्वासन आज मी जिल्ह्यातील समाज बांधवाना देतो आसे बजरंग सोनवणे अंबाजोगाई येथील आयोजित प्रचार सभेत बोलत



होते

एखाद्याला वाघाचं कातडं पांघरणं आणि खरंच वाघ असणे यात फरक आहे. परळी मतदारसंघात वाघाची कातडी पांघरून दादागिरी सुरू आहे.'' असं म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लोकसभा उमेदवार बजरंग सोनवणे यांनी मुंडे बंधू-भगिनीवर हल्लाबोल केला.

बीड लोकसभा मतदार संघात बजरंग सोनवणे व भाजपच्या पंकजा मुंडे यांच्यात चुरशीची लढाई सुरु आहे. तर मुंडेंकडून करण्यात येणार्या आरोपांवर सडेतोड उत्तर देण्यासह जोरदार प्रतिहल्ला देखील सोनवणे करतना दिसत आहेत. अशातच सिरसाळा येथील सभेत बजरंग सोनवणे यांनी मुंडेंवर निशाणा साधला. आम्हाला ऊसाचे बील दिले नाही, असे प्रत्येक गावातील शेतकरी सांगत आहेत. शिवाय यांनी मुकादमांचे पैसे दिले नाहीत, कामगारांचे पैसे दिले ◀◀ पान २ वर

# पंकजाताईने मंत्री असताना कसलाच विकास केला नाही; सिताराम क्षीरसागर

**माजलगाव । प्रतिनिधी**

पंकजाताई मुंडे यांनी महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून असताना जिल्ह्यामध्ये काहीच विकास केला नाही. तर आता काय करणार आहेत? असा सवाल सामाजिक न्याय सेलचे शरद पवार गटाचे जिल्हा उपाध्यक्ष सिताराम क्षीरसागर यांनी उपस्थित केला आहे



त्यांनी तालुक्यातील ब्रह्मगाव येथे एका कॉर्नर बैठकीत वरील सवाल उपस्थित केला असून मंत्री असताना जिल्ह्यात कसला विकास केला नाही उलट त्यांचा चिक्की घोटाळ्यात समावेश असल्याचा आरोप त्यांच्यावर त्या काळात होत होता तसेच त्यांच्या भगिनी खासदार प्रीतम ताई मुंडे या दहा वर्षे खासदार असताना त्यांना केंद्र शासनाचा एकही प्रकल्प बीड जिल्ह्याचा आणता आला नाही. स्वतःचा खासदार फंड ही त्यांनी खर्च केला नाही. म्हणून या दोन्ही भगिनींना मते मागण्याचा अधिकारच नाही म्हणून येत्या १३ तारखेला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट यांचे अधिकृत उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना मतदान करून विकासाला मतदान करा असे आव्हान त्यांनी उपस्थिती या बैठकीत केले या बैठकीत त्यांच्यासोबत सामाजिक न्याय सेल चे तालुका अध्यक्ष प्रभाकर नरवडे, टी. आर. जावळे, अशोक नाडे, दशरथ सुतार , लक्ष्मण आलाट, रमेश सातपुते हे उपस्थित होते या बैठकीला पुनर्वसन गावातील बहुसंख्य महिला पुरुष उपस्थित होते

# बजरंग सोनवणेंना केज तालुका सकल धनगर समाजाचा जाहीर पाठिंबा

केज । प्रतिनिधी

बीड लोकसभा महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना अठरा पगड जाती धर्मातील लोकांचा पाठिंबा मिळत असताना त्यांना केज तालुक्यातील सकल धनगर समाजाने बिनशर्त जाहीर पाठिंबा दिला आहे. बजरंग बप्पा यांना निवडून आणण्यासाठी सकल धनगर समाज एकवटला आहे.

बजरंग बप्पा सोनवणे यांना दिल्लीच्या तक्तावर बसविण्यासाठी केज तालुक्यातील सकल धनगर समाजाने वज्रमुठ आवळली आहे. शुक्रवारी (दि. १०) धनगर समाजाचे नेते युसूफवडगावचे सरपंच महेश गायके, शेकापचे नेते भाई अशोक रोडे, औरंगपूर



ग्रामपंचायतचे माजी सरपंच सुधीर रानमारे, केजचे नगरसेवक बाळासाहेब गाढवे, माजी नगरसेवक अंगद गाढवे, युवक काँग्रेसचे केज शहर अध्यक्ष सचिन रोडे, शिवसेनेचे केज शहर प्रमुख तात्या रोडे, युवा नेते राम डुकरे यांच्या मार्गदर्शनाखाली केज तालुक्यातील धनगर समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत बजरंग बप्पा सोनवणे यांना निवडून आणन्यासाठी समाज बांधवांनी सर्वानुमते निर्धार केला. बजरंग बप्पा यांना समाजाचे भरघोस मतदान देऊन निवडून आणून लोकसभेत पाठवणार असा निर्णय सर्व समाज बांधवानी घेतला. या बैठकीला राष्ट्रवादीचे नेते रामेश्वर हजारे, माळेवाडीचे ग्रामपंचायत सदस्य गोपाळ पावणे, शिवाजी कसपटे, ◀◀ पान २ वर

# संभाजीनगरमध्ये शिवसेना शिंदे गट आणि शिवसेना उबाठा गटाचे कार्यकर्त्ये एकमेकांसमोर

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीच्या चवथ्या टप्प्यासाठी १३ मे ला मतदान होत आहे. महाराष्ट्रातील ११ लोकसभा मतदारसंघातही मतदान होत आहे. तत्पूर्वी चवथ्या टप्प्यातील प्रचाराचा शनिवारी शेवटचा दिवस असतानाच संभाजीनगरमध्ये शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्त्ये आणि शिवसेना उबाठा गटाचे कार्यकर्त्ये समोरासमोर येत परस्पर विरोधी घोषण देऊ लागले. मात्र उशीराने का होईना पोलिसांनी हस्तक्षेप करत दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांना एकमेकांपासून दूर नेले.

शिवसेना शिंदे गटाने आणि भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून संभाजीनगर लोकसभा मतदारसंघातून विद्यमान मंत्री संदीपान भुमरे यांना उमेदवारी दिली. तर शिवसेना उबाठा गटाकडून चंद्रकात खैरे यांना उमेदवारी देण्यात जाहिर करण्यात आली. शनिवारी प्रचाराचा शेवटचा दिवस असल्याने दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांकडून मतदारांपर्यंत



पोहोचून प्रचाराचा शेवटचा दिवस सत्कारणी लावण्याचा प्रयत्न सुरु केला. त्यामुळे क्रांती चौकात काहीसे तणावपूर्व वातावरण निर्माण झाले. तर दुसऱ्याबाजूला विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे संदीपान भुमरे यांच्या पैठण येथील देशी दारूच्या दुकानातून मिळणाऱ्या भिंगरी या देशी दाऊच्या बाटल्या दाखवित भिंगरी भिंगरी अशी घोषणाबाजी करत संदीपान भुमरे यांच्या कार्यकर्त्यांना चिडवत होते. दरम्यान, संदीपान भुमरे यांनी त्यांच्या पत्नीच्या नावाने दोन मद्यविक्रीचे परवाने घेतल्याची तशी माहिती उमेदवारीच्या प्रतिज्ञापत्रात संदीपान भुमरे यांच्याकडूनच देण्यात आली. त्यानंतर शिवसेना उबाठा गटाकडून विरोधी उमेदवाराच्या विरोधातील प्रमुख हत्यार म्हणून त्याचा वापर करण्यात येत आहे. तर दुसऱ्याबाजूला भुमरे यांनी महाविकास आघाडीचे आणि शिवसेना उबाठा गटाचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांना मुस्लिमस्नेही ठरविण्याचा प्रयत्न सुरु केला. यावरून संभाजीनगरमधील शिवसेना उबाठा आणि शिंदे गटाच्या शिवसेनेचे कार्यकर्त्ये चांगलेच भिडल्याचे दिसून आले. अखेर परिस्थिती जास्तच तणावपूर्ण बनू लागल्याचे दिसू लागताच पोलिस आणि काही कार्यकर्त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

या प्रचारफेरीत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे ही सहभागी झाले होते. भुमरे यांना १४ मद्याचे परवाने दोन वर्षात कसे मिळाले असा सवाल उपस्थित केला. यावेळी अंबादास दानवे यांनी देशी दारूच्या भिंगरी नावाच्या दोन दारूच्या बाटल्या हातात धरल्या आणि भिंगरी विक्रेता असे म्हणायला सुरुवात केली. त्यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनीही भिंगरी भिंगरी अशी घोषणाबाजी सुरु केली.

# पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ मोंढा भागात  नगरसेवक अमर नाईकवाडे यांच्या नेतृत्वाखाली निघाली भव्य पदयात्रा

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष आणि महायुतीच्या बीड लोकसभेच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ शनिवारी (दि.११)बीड शहरातील मोंढा भागात नगरसेवक अमर नाईकवाडे यांच्या नेतृत्वाखाली भव्य पदयात्रा काढण्यात आली. मोंढा भागातील शेकडो व्यापाऱ्यांच्या दुकानात जाऊन स्वतः अमर नाईकवाडे व त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी पंकजाताई मुंडे यांचा विकासाच्या वचननाम्याच्या प्रति वितरित केल्या. व्यापारी बांधवांनी बीड शहराच्या भविष्यातील सर्वांगीण विकासासाठी येत्या १३ तारखेला पंकजाताई मुंडे यांच्या कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून त्यांना प्रचंड मताधिक्याने



निवडून द्यावे असे आवाहन केले.

या पदयात्रेला मोंढा भागातील व्यापाऱ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिल्याचे चित्र पहावयास मिळाले.

बीड लोकसभेच्या निवडणुकीचा प्रचार शनिवारी सायंकाळी थांबणार आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी (दि.११) सकाळी ११ वाजता नगरसेवक अमर नाईकवाडे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील मोंढा भागात भव्य पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत

संतोष सोनी, दत्तात्रेय (देवा) नलवडे, बाळकृष्ण काका सीकची, अंगद नवले, बाबुराव परळकर,अभिषेक चरखा, दत्तप्रसाद तापडिय, विनोद पिंगळे, गणेश भोज,गणेश कासट, किशोर सेठ नहार,निलेश लोढा, गोविंद तोष्णीवाल, भिमराव काळे, रमेश सेठ पगारीया, निलेश संचेती, तांदळे, पांडुरंग जोगदंड,अशोक शहागडकर, उमेश संचेती,अशोक राऊत,अमित छाजेड, नंदू गवली, अक्षय मस्के, निलेश संचेती,बाळासाहेब घोडके, संतोष अप्पा मोरे, सुनील घोलप, ज्ञानेश्वर बंगाळ, शांतिनाथ बोपलकर, रमेश लांडगे,आकाश नहार, युवराज चरखा, भरत पटेल, अभिजित दोडे, ऋषभ बाफना, संतोष क्षिरसागर रामदास सरवदे, विलास डिंगणे,अंकुश काळे, देवेंद्र सोनवणे, सुरज कदम, दत्ता म्हेत्रे, गणेश मानकुस, शेर खान नागेश कादे, सय्यद रज्जाक, शेख सलमान, सूरज कदम, मयूर नाईकवाडे यांच्यासह व्यापारी बांधव व प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade.  Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com   NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com   NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# मी चुकलो, मला माफ करा...!

## सांगता सभेत भर पावसात अजित पवार कोल्हें विरोधात बोलले

**पुणे । प्रतिनिधी**

अमोल कोल्हेंना मागच्या लोकसभेच्या निवडणुकीत उमेदवारी देऊन आणि खासदार करुन मोठी चूक केली, अशी खंत अजित पवारांनी भर पावसात घेतलेल्या सांगता सभेत बोलून दाखवली. त्यासोबत अमोल कोल्हेंवर शाब्दिक फटकेबाजीदेखील केली. यावेळी चाकणकरांनी अजित पवारांची सभा भर पावसात ऐकली. अनेकजण सभेत थेट डोक्यावर खुर्च्या घेत अजित पवारांची सभा ऐकताना दिसले. उपमुख्यमंत्री अजित पवारांनी शनिवारी चाकणमध्ये भर पावसात सांगता सभा घेतली.





शिरुर लोकसभा मतदार संघासाठी येत्या १३ मेला मतदान पार पडणार आहे. शनिवारी शिरुर मतदारसंघासाठी सांगता सभा झाली. अजित पवार म्हणाले की, मागील पाच वर्षांपूर्वी या अजित पवारांनी मोठी चूक केली. डॉक्टर अमोल कोल्हेंना माझ्या मुंबईच्या घरी बोलवून त्यांचा पक्षात प्रवेश करुन घेतला आणि शिरुर लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी दिली. उमेदवारी दिल्यानंतर आणि खासदार म्हणून निवडणून आल्यानंतर पाच वर्षासाठी माझ्या शिरुर लोकसभा मतदारसंघाचा सर्वांगिण विकास करण्याचा प्रयत्न अमोल कोल्हे करतील. मी चुकलो, मी अपयशी ठरलो, मला ती चूक मान्य आहे. आता चूक सुधारण्याची वेळ आली आहे. आढळराव पाटलांना निवडून आणा, असे आवाहन अजित पवारांनी केले आहे. अमोल कोल्हेंनी पाच वर्षात कोणतीही कामं केली नाहीत. विकास कामांकडे लक्ष दिले नाही. येत्या पाच वर्षात मी सगळे कामं पूर्ण करेन आणि विकास करुन दाखवेन. मी कामाचा माणूस आहे मला काम करायला आवडते. त्यासोबतच कांद्याचा प्रश्नासंदर्भातदेखील सगळ्या महत्वाच्या नेत्यांशी बोलणार आणि तो प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करणार आहे, अशीही ग्वाही अजित पवारांनी चाकणकरांना दिली. मी शेतकऱ्यांचा मुलगा आहे. आम्हाला पावसात काम करण्याची सवय आहे. चाकणकरांनो आपण शेतकऱ्यांची औलाद आहोत. आपण पावसात भिजल्याशिवाय राहत नाही. त्यामुळे पावासाचा आपल्या कामावर फरक पडत नाही, असे म्हणज अजित पवारांनी भर पावसात चाकणकरांना संबोधित केले. आपल्याला मोठ्या मताधिक्याने आढळराव पाटलांना निवडून आणायचे आहे. विकासासाठी त्यांना मतदान करा, असे आवाहन त्यांनी केले.





## निवडणूकीसाठी पीएमपीएमएल देणार ८१८ बसेस, परिणामी शहर व उपनगरात पीएमपीएमएलच्या फेऱ्या होणार कमी

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुषंगाने पुणे शहर, मावळ व शिरूर या तीन लोकसभा मतदार संघातील एकूण १० मतदार संघांकरीता मतदान होणार आहे.

त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागणीनुसार रविवारी (दि.१२) व सोमवारी (दि.१३) या कालावधीत ८१८ बसेस देण्याचे नियोजन केलेले आहे.

त्यामुळे येत्या रविवारी व सोमवारी पुणे व पिंपरी-चिंचवड शहर, शहरालगत ची उपनगरे व पीएमआरडीए हद्दीतील मार्गांवर बसेसचे प्रमाण कमी राहणार आहे.

त्यामुळे प्रवाशांची काही प्रमाणात गैरसोय होऊ शकते.तरी नागरिकांनी त्यानुसार त्यांच्या कामाचे नियोजन करून स्वतःची गैरसोय टाळावी, असे आवाहन पीएमपीएमएल तर्फे करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात आचारसंहिता भंगाच्या १ हजार ५०० तक्रारींवर कार्यवाही

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीदरम्यान जिल्ह्यात 'सी- व्हिजील' ॲपच्या माध्यमातून १५ मार्चपासून ते आतापर्यंत प्राप्त १ हजार ५०५ तक्रारींपैकी १ हजार ३२९ तक्रारींमध्ये तथ्य आढळून आल्याने कारवाई करण्यात आल्याची तर तथ्य आढळले नसलेल्या उर्वरित १७६ तक्रारी वगळण्यात आल्याची माहिती जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे देण्यात आली आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाच्या तक्रारी नोंदवण्यासाठी आणि त्याचा मागोवा घेण्यासाठी निवडणूक आयोगाच्या 'सी-व्हिजिल' ॲपला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्या माध्यमातून दाखल होणाऱ्या तक्रारींवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हा स्तरावर सी-व्हिजिल कक्ष कार्यान्वीत आहे.

सी-व्हिजिल ॲपवर नागरिक माहिती, छायाचित्र, चित्रफीत अपलोड करुन आचारसंहिता भंगाच्या तक्रारी करु शकतात. नागरिकांना आपली ओळख उघड न करता तक्रार दाखल करण्याची सोय या ॲपमध्ये आहे. अशा प्रकारे १५ मार्चपासून आतापर्यंत १ हजार ५०५ तक्रारी प्राप्त झाल्या. यापैकी १ हजार ३२९ तक्रारींवर कारवाई तर उर्वरित १७६ तक्रारी निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर वगळण्यात आल्या.

आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन व्हावे आणि निवडणुका शांततेत आणि मुक्त वातावरणात घेण्याचे भारत निवडणूक आयोगाचे मुख्य उद्दष्टि आहे. आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्या अनुचित प्रकारांची तक्रार या ॲपच्या माध्यमातून नागरिकांना थेट ऑनलाईन करता येते. या ॲपमुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तक्रारी स्वीकारणे, या तक्रारीवर अवघ्या १०० मिनिटांत कार्यवाही करणे अपेक्षित असते.

सी-व्हिजिल ॲपवर प्राप्त तक्रारी व कंसात कारवाई झालेल्या तक्रारी

आंबेगाव विधानसभा-२३ (१६), बारामती-५४ (३०), भोर-३ (२), भोसरी-४ (३), चिंचवड-३३ (२२), दौंड-२८ (१९), हडपसर-४७ (४०), इंदापूर-४७ (४०), जुन्नर-३७ (३५), कसबापेठ-२४७ (२२३), खडकवासला-७८ (७१), खेड आळंदी-३ (१), कोथरूड-४३ (३२), मावळ-४५ (३०), पर्वती-२५८ (२५७), पिंपरी-११ (९), पुण कॅन्टोन्मेंट-१०९ (९१), पुरंदर-११ (८), शिरूर-३२ (१५), शिवाजीनगर-७१ (७०) व वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघात - ३२१ (३१५) अशा एकूण १ हजार ५०५ तक्रारी प्राप्त झाल्या व १ हजार ३२९ तक्रारींवर कारवाई झाली.

जिल्ह्यात चौथ्या टप्प्यात मावळ, पुणे आणि शिरूर लोकसभा मतदासंघाकरीता सोमवार १३ मे रोजी मतदान होत आहे. जिल्ह्यात कुठेही आचारसंहितेचे उल्लंघन होत असेल तर नागरिकांनी तेथील छायाचित्र किंवा चित्रफीत काढावी आणि तत्काळ सी-व्हिजिल ॲपवर अपलोड करावे किंवा जिल्हा नियंत्रण कक्षाकडे आणि १८००२३३०१०२ आणि १९५० टोल फ्री क्रमांकावर तक्रार करावी, असे आवाहनही जिल्हा निवडणूक कार्यालयाने केले आहे.

# पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत कलम १४४ लागू; 'या' गोष्टींना असेल बंदी

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत तिसऱ्या टप्प्यात मतदान होणारे लोकसभेचे पुणे, शिरूर व मावळ या मतदारसंघातील भाग आहे. निवडणुका सुरळीत, शांततेत पार पडण्यासाठी आयुक्तालयाच्या हद्दीत सीआरपीसी कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत''. त्यानुसार मतदान केंद्रांपासून ठराविक अंतरापर्यंत अनेक बाबींना निर्बंध असणार आहेत. हे आदेश मंगळवारी (दि. १४) रात्री बारा पर्यंत लागू असणार आहेत. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी हे आदेश दिले आहेत.

खालील बाबींसाठी निर्बंध असतील

मतदाना दिवशी मतदान केंद्रात तसेच मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात प्रिसायडींग ऑफिसर, निवडणुक कामकाज संदर्भाने नेमलेले शासकीय व्यक्ती, कायदा व सुव्यवस्था बंदोबस्तासाठी नेमलेले शासकीय व्यक्ती ज्यांना निवडणूक संदर्भात संपर्क करणे आवश्यक आहे. यांच्या व्यतिरिक्त इतर व्यक्तींना मोबाईल फोन, स्मार्ट फोन, वायरलेस किंवा संपर्क साधने वापरण्यास मनाई आहे.

मतदान केंद्राचे २०० मीटर परिसरात तात्पुरत्या स्वरुपाचे पक्ष कार्यालय कोणत्याही धार्मिक, शैक्षणिक आस्थापनेत किंवा किंवा अतिक्रमण करुन उभारण्यास मनाई आहे.

संरक्षण प्राप्त व्यक्तींना मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात सुरक्षा रक्षकासह प्रवेश करण्यास मनाई आहे.

मतदान केंद्राचे २०० मोटर आतमध्ये इलेक्शन बूथ लावता येणार नाही. एका इमारतीत एकापेक्षा जास्त मतदान बूथ असतील तरी देखील त्या इमारतीसाठी एका उमेदवाराला एकापेक्षा जास्त बूथ लावता येणार नाही.

मतदान दिवशी मतदान केंद्राचे २०० मीटर क्षेत्रामध्ये प्रचार करण्यास मनाई आहे.

मतदान केंद्राचे २०० मीटर त्रिज्यामध्ये वाहन आणण्यास मनाई आहे.

लाऊड स्पीकर, मेगाफोन, आरडाओरडा करणे, गोंधळ करणे, दुवर्तन करणे, अशा प्रकारास मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मनाई आहे.

मतदान समाप्तीकरिता निर्धारीत केलेल्या वेळेच्या ४८ तास आधीपासून ज्या मतदारसंघात मतदान होणार आहे तेथे मतदार नसलेले राजकीय कार्यकर्ते वा प्रचार कार्यकर्ते त्यांना त्या मतदारसंघात थांबणेस मनाई असेल.

मतदान समाप्तीकरिता निर्धारीत केलेल्या वेळेच्या ४८ तास आधीपासुन राजकीय प्रचार करण्याच्या उद्देशाने कोणतेही बल्क मेसेज पाठविण्यास मनाई असेल.मतदान दिवशी मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरामध्ये कोणत्याही प्रकारचे शस्त्र / हत्यार बाळगण्यास मनाई आहे.

## भर पावसातही पोलिसांकडून नाकाबंदी; एसएसटी पथकाकडून २४ तास तपासणी

पुणे : : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत नाकाबंदी करून संशयित वाहनांची तपासणी केली जात आहे. शुक्रवारी (दि.१०) भर पावसात शिवाजी रस्त्यावरील शनिवारवाडा गेट नाक्यावर पोलिस व प्रशासनाकडून चारचाकी व दुचाकी वाहनांची कसून चौकशी सुरू होती. शिवाजी रस्त्यावरील शनिवारवाडा गेट नाक्यावर २४ तास पोलिस व प्रशासन यांचे पथक कार्यरत असून त्यांच्यामार्फत अवैध रोकड, अंमली मद्यपदार्थ, हत्यारे यांना प्रतिबंध करण्यासाठी चारचाकी व दुचाकी वाहनांची कसून चौकशी केली जात आहे.



सोमवारी (दि.१३) पुणे लोकसभा निवडणूक पार पडत आहे. निवडणूक काळात उमेदवारांकडून मतदारांना पैशाची लालूच दाखविणे तसेच आचारसंहितेचा भंगाचे गैरप्रकार घडण्याची शक्यता असते, त्यांना आळा बसावा यासाठी निवडणूक आयोगाच्या वतीने कसबा विधानसभाअंतर्गत शिवाजी रस्त्यावरील शनिवारवाडा परिसर तसेच स्वारगेट परिसरातील नटराज हॉटेल याठिकाणी तपास नाका तयार करण्यात आला. तेथे पोलिसांकडून चारचाकी-दुचाकी प्रत्येक संशयास्पद वाहनांची कसून चौकशी होत आहे. गाडी नंबर, फोन नंबर, नावांची रजिस्ट्रमध्ये नोंद केली जात आहे.

शिवाजी रस्त्यावरील या पथकामध्ये तीन पोलिस कर्मचारी, निवडणूक अधिकारी व एक व्हिडीओग्राफर यांचा समावेश आहे. निवडणूक आयोगाच्या पथकाकडून शिवाजी रस्त्यावरील ये-जा करणार्या खासगी वाहनांची व्हिडीओ शूटिंग करीत असून वाहनांची तपासणी करण्यात येत आहे. ही पथके २४ तास कार्यरत असून त्यांच्यामार्फत अवैध रोकड, अंमली पदार्थ, हत्यारे यांना प्रतिबंध करण्यासाठी चारचाकी व दुचाकी वाहनांची कसून चौकशी केली जात आहे.

## सोलापूरसाठी उजनीतून सोडले पाणी; धरणकाठावरील शेतकरी चिंतेत

**इंदापूर । प्रतिनिधी**

सोलापूर, पंढरपूर, सांगोला आणि मंगळवेढ्यासह भीमा नदीवर अवलंबून असणार्या सोलापूर जिल्ह्यासह इतर गावांच्या पिण्याच्या पाण्यासाठी शुक्रवारी (दि. १०) सकाळी ९ वाजता १५०० क्यूसेकने उजनी (यशवंत सागर) धरणातून भीमा नदीपात्रात विसर्ग सोडण्यात आला. दुपारी साडेबारा वाजता तीन हजार, तर अडीच वाजता साडेचार हजार क्युसेकने, तर सायंकाळी सहा हजार क्यूसेकने पाणी सोडण्यात आले. यामुळे सोलापूरकरांना काही अंशी दिलासा मिळाला असला, तरी उजनीवर अवलंबून असणार्या इंदापूर तालुक्यातील शेतकर्यांची चिंता वाढली आहे.

उजनी धरणात सध्या वजा ४४ टक्के पाणीसाठा आहे. सोलापूर जिल्ह्याला पिण्यासाठी हे आवर्तन सोडण्यात आले आहे. याचा फटका मोठ्या प्रमाणात इंदापूर तालुक्यातील शेतकर्यांना बसणार आहे. दौंड तालुक्यात भीमा नदी कोरडी पडली आहे. तर इंदापूर तालुक्यात धरणातील पाणी झपाट्याने कमी कमी होत आहे. शेतकरी पिके जगवण्यासाठी पाईप जोडण्याच्या खर्चाने मेटाकुटीला आला आहे. नदीचे पाणी खोल गेल्याने पर्यायी म्हणून जेसीबी पोकलेनच्या साह्याने चर खोदून त्यामध्ये मोटरीने पाणी आणून तेथून पुढे पाईप लाईनद्वारे शेतापर्यंत नेले जात आहे. त्यातच जनावरांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू लागली आहे.

## नोकरीचे आमिष दाखवून ९ जणांना लाखोंचा गंडा, ५ जणांवर गुन्हा दाखल

पुणे : कंपनीत नोकरी लावण्याचे आमिष दाखवून वेगवेगळी कारणे सांगून तक्रारदार व इतर नऊ जणांकडून ५९ लाख ६८ हजार ५०० रुपये घेतले. त्यांना कंपनीचा लोगो असलेले बनावट लेटर देऊन आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी खडकी पोलिसांनी पाच जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार ऑगस्ट २०२१ ते मे २०२३ या कालावधीत खडकी येथे घडला आहे.

याबाबत संदीप बबन इंदलकर (वय-५१ रा. रघुकुलनगरी, औंध रोड, खडकी, पुणे) यांनी खडकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार धनंजय लक्ष्मण कारखानीस (वय-३० रा. बी.ई.जी. ॲन्ड सेंटर, खडकी), तुषार धनंजय कारखानीस, रोहित धनंजय कारखानीस, नूतन धनंजय कारखानीस, श्रावणी देबनाथ यांच्यावर भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ४६५ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी धनंजय आणि तुषार कारखानीस यांनी रोहित कारखानीस याला नोकरी लावण्यासाठी पैशांची गरज असल्याचे सांगून फिर्यादी यांच्याकडून १ लाख ८७ हजार रुपये घेतले. मात्र, त्यांनी वेळेत परत केले नाही. दरम्यान, ऑगस्ट २०२१ मध्ये कोलइंडी या कंपनीत कोवीडमुळे जागा रिक्त झाल्या आसून त्या भरणार असल्याचे आरोपींनी फिर्यादी यांना सांगितले. तुमच्या मुलीला कंपनीत नोकरी लावतो असे आमिष दाखवून फिर्यादी यांच्याकडून १६ लाख ६३ हजार रुपये रोहितच्या बँक खात्यात जमा करण्यास सांगितले.

त्यानंतर ऑक्टोबर २०२१ मध्ये रोहित याने फिर्यादी व त्यांच्या मुलीला खडकी येथील घरी बोलावून घेतले. मुलीचे रजीस्ट्रेशन करायचे असल्याचे सांगून त्याने हाताचे ठसे कोऱ्या कागदावर घेतले. याशिवाय इतर ९ उमेदवारांना व्हिडीओ कॉन्फरन्स, विमान तिकीट, राहण्यासाठी पैसे लागतील असे सांगून त्यांच्याकडून ४१ लाख १८ हजार ५०० रुपये घेतले नोकरी आमिष दाखवून घेतले. त्यानंतर आरोपींनी कोलइंडीया कंपनीचा लोगो असलेले खोटे व बनावट मेडीकल लेटर फिर्यादी व इतर नऊ जणांना पाठवून आर्थिक फसवणूक केली. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# दूध दरामध्ये मोठी घसरण; शेतकऱ्यांना आर्थिक फटका

सोमेश्वरनगर : गायी, म्हशीच्या दूध दरात घट झाल्याने दूध उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत. यामुळे गोठा मालकांनी तर जनावरांना बाजाराचा रस्ता दाखवत दावणी रिकाम्या करण्याचा निर्णय घेतला आहे. बाजारात दुभत्या जनावरांच्या किंमतीही ३० ते ४० हजार रुपयांपर्यंत कमी झाल्या आहेत. दूध दर उतरल्याने शेतकर्यांना जनावरे सांभाळण्याराठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. बारामती तालुक्यात मोठ्या प्रमाणात दूध व्यवसाय केला जातो. मात्र, चार्याअभावी आणि दुधाचे घसरलेले दर यामुळे बळीराजाला नुकसान सहन करत जनावरांचे पालन-पोषण करावे लागत आहे. ग्रामीण भागात शेतीला जोडधंदा पशुपालन व्यवसाय निवडला जातो.

त्यामुळे शेतकर्यांच्या दारासमोर हमखास दोन-चार जनावरांची दावण असते. तरुणवर्गही दूध व्यवसायाकडे आकर्षित झाल्यामुळे तालुक्यातील अनेक गावागावात जनावरांचे



गोठे तयार झाले होते. मात्र, दुधाचे दर उतरल्याने उत्पादन आणि खर्चात प्रचंड तफावत निर्माण झाली. त्यामुळे दूध उत्पादकांनी जनावरांना बाजारचा रस्ता दाखवण्यास सुरुवात केली आहे. लोणंद, बारामती, काष्टी, राशीन येथील बाजारात जनावरांच्या किमती कमी झाल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

यापूर्वी गायीच्या दुधाला गुणवत्तेनुसार २२ ते ३० ३२ रुपये दर मिळत होता. सध्या २० ते २५ रुपये प्रतिलिटरला दर मिळत आहे. त्यामुळे गायीच्या दूध दरात आठ ते नऊ रुपयांची घसरण झाली आहे. म्हशीच्या दूध दराला यापूर्वी गुणवत्तेनुसार सरासरी ३५ ते ४५ रुपये दर मिळत होता. पण, म्हशीच्या दूध दरातही आठ ते दहा रुपयांनी घसरण झाली असून सध्या २५ ते ३५ रुपयापर्यंत दर मिळत आहे. दुधाचे दर घसरले असले तरीही जनावरांच्या खाद्याच्या दरामध्ये वाढ झाली आहे. गोळीपेंड १५२० रुपयांना मिळत आहे. कडब्याचे दरही तीन हजार रुपयांवर गेले आहेत. भुसाही महागला आहे.

## आंबेगाव, जुन्नर तालुक्यांत बिबट्यांचे हल्ले वाढले : सरकार आणि वन विभाग सुस्त

जुन्नर : : आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यात मोठ्या प्रमाणात मानवावर हल्ले वाढले असताना वन विभाग मात्र सुस्त आहे. सरकार आणि वन विभागाला माणसापेक्षा बिबटे महत्त्वाचे असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. गेल्या दोन दिवसात जुन्नर तालुक्यात बिबट्यांच्या हल्ल्यात दोन जणांचा मृत्यू झाला असतानाही राजकीय नेते मात्र निवडणुकीत व्यस्त आहेत. तर जनता बिबट्यांच्या भयामुळे त्रस्त झाली आहे. बिबट्यांच्या उपद्रवामुळे आणि भीतीमुळे शेती कामांवर परिणाम झाल्याचे दिसून येते.आंबेगाव, जुन्नर, शिरूर तालुक्यातील बिबट्यांचे हल्ले रोखण्याबाबत वन विभागाने ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी शेतकरी, नागरिकांकडून केली जात आहे.

आंबेगाव, शिरूर, जुन्नर तालुक्यात उसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्याने बिबट्याला लपण क्षेत्र व अन्न, पाणी मोठया प्रमाणात



उपलब्ध होते. त्यामुळे बिबट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पूर्वी रात्री दिसणारे बिबटे आता दिवसाही दिसू लागले आहेत. बिबटे शेतकर्यांच्या पाळीव जनावरांवर हल्ले करत आहेत. गेल्या काही दिवसांपासून मानवावर देखील हल्ले वाढले आहेत. आंबेगाव तालुक्यात मेंढपाळ कुटुंबावर, तसेच दुचाकीचालक, महिलांवर बिबट्याने हल्ले केले आहेत. जुन्नर तालुक्यात नुकतेच बिबट्याने तिघांवर हल्ला केला. यामध्ये आठ वर्षीय मुलासह एका शेतमजूर महिलेचा मृत्यू झाला. वारंवार हल्ले होऊनही वनविभाग ठोस भूमिका घेत नाही. त्यामुळे सरकार व वनविभागाला माणसापेक्षा बिबटे महत्त्वाचे आहे का? असा प्रश्न नागरिक विचारत आहे.

आंबेगाव, जुन्नर, शिरूर तालुक्यात साखर कारखाने असल्याने उसाचे क्षेत्र मोठे आहे. दिवसा वीज नसल्याने रात्रीच्या वेळी शेतीला पाणी द्यावे लागते. मात्र, आता बिबट्या ऊसाच्या क्षेत्राबरोबर बाजरी, मका, कडवळ या पिकांमध्येही दिसतो. त्यामुळे शेती पिकांना रात्री पाणी देताना भीती वाटते. अनेकदा पहाटे तसेच सायंकाळी बिबट्याचे दर्शन होत असल्याने नक्की कुठल्या वेळेत शेती पिकांना पाणी द्यावे, असा प्रश्न शेतकर्यांना पडला आहे.